सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १९ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## बालविवाह प्रथा संपुष्टात आणण्यास प्रत्येक जिल्ह्यात खास अधिकारी नेमा - सुप्रीम कोर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली**

बालविवाहाची प्रथा ही अतिशय गंभीर सामाजिक समस्या असून ती संपुष्टात आणण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र, राज्य सरकार व अन्य संबंधित यंत्रणांना शुक्रवारी दिले. बालविवाहाची प्रथा मोडीत काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विशेष अधिकारी नेमण्याचे आदेश सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जी. बी. पारडीवाला, न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने आपल्या १४१ पानी निकालपत्रात दिले.

या खंडपीठाने सदर खटल्यात नऊ विविध मुद्द्यांवर आदेश दिले आहेत. बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६च्या अंमलबजावणीत वैयक्तिक कायद्यांमुळे अडचणी येत आहेत याबाबत उच्च न्यायालयांच्या परस्परविरोधी निकालांची माहिती सादर करण्यात केंद्र सरकार अपयशी ठरले आहे. बालविवाह प्रतिबंध (सुधारणा) विधेयक २१ डिसेंबर २०२१मध्ये संसदेत सादर करण्यात आले. हे विधेयक विविध विभागांच्या स्थायी समितीकडे पाठविण्यात आले.



**बालविवाह रोखण्यासाठी विशेष पोलिस पथक द्या**

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, देशातील प्रत्येक जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी यांच्यावरही बालविवाहांना प्रतिबंध करण्याची जबाबदारी असणार आहे. बालविवाह रोखण्यासाठी पोलिसांचे विशेष पथक स्थापन करण्यात यावे. राज्यांतील गृह खात्याने त्यादृष्टीने निर्णय घ्यावा असेही न्यायालयाने सांगितले.

**'त्या' कर्मचाऱ्यांवर कारवाई करा**

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, बालविवाहाचा प्रकार आढळल्यास तसेच त्याला प्रतिबंध करण्यासाठी न्यायिक दंडाधिकाऱ्यांनी स्वतःहून कारवाई करावी तसेच प्रतिबंधात्मक आदेश जारी करावे. बालविवाह रोखण्यात कसूर केल्याचे आढळल्यास त्या सरकारी कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची तसेच कायदेशीर कारवाई करावी असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

**अभ्यासक्रमात लैंगिक शिक्षणाचा करा समावेश**

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, शुभ मानल्या जाणाऱ्या दिवशी सामुदायिक विवाह मोठ्या प्रमाणावर होतात. त्यात बालविवाहांचेही मोठे प्रमाण असते. बालविवाह रोखण्यासाठी अशा शुभ दिवसांतील घडामोडीकडे न्यायदंडाधिकाऱ्यांनी बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. जागतिक आरोग्य संघटनेने ठरवून दिलेल्या निकषांनुसार शालेय अभ्यासक्रमांमध्ये सर्वसमावेशक लैंगिक शिक्षणाचा अंतर्भाव करण्यात यावा असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. बालविवाह रोखण्याकरिता स्थापन करण्यात येणाऱ्या विशेष पोलीस पथकातील अधिकाऱ्यांना बालविवाह प्रतिबंध कायद्यातील तरतुदी, बालकांचे हक्क आदी गोष्टींचा कायदेशीर अर्थ समजून सांगण्यासाठी प्रशिक्षण दिले पाहिजे.

## मणिपूरमध्ये पुन्हा उसळला हिंसाचार अतिरेक्यांनी गावात केले बॉम्बस्फोट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९जिरीबाम मणिपूर**

मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. शनिवारी जिरीबाम जिल्ह्यातील एका गावावर अतिरेक्यांनी हल्ला केला. त्यानंतर याठिकाणी हिंसाचार उसळला. यासंदर्भात एका अधिकाऱ्याने माहिती दिली. अधिकाऱ्याने सांगितले की, अतिरेक्यांनी पहाटे ५ वाजता बोरोबेकरा पोलीस ठाण्याअंतर्गत असलेल्या एका गावाला आधुनिक शस्त्रांनी लक्ष्य केले. अतिरेक्यांनी बॉम्बस्फोटही केले. यादरम्यान केंद्रीय राखीव पोलीस दल आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रत्युत्तर दिले आणि दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार झाला.

याचबरोबर, घटनास्थळी अतिरिक्त सुरक्षा दल पाठवण्यात येत असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही, ही दिलासादायक बाब आहे. ज्यावेळी हा हिंसाचार उसळला, त्यावेळी सुरक्षा दलाने वृद्ध, महिला आणि लहान मुलांना सुरक्षित स्थळी हलविले. जिरीबाम शहरापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर असलेले बोरोबेकरा घनदाट जंगलांनी वेढलेले आणि डोंगराळ भाग आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात राज्यात जातीय हिंसाचार भडकल्यानंतर या भागात असे अनेक हल्ले झाले आहेत.

## लाडक्या बहिणी दिवाळी बोनसपासून मुकणार निवडणूक आयोगाने तात्पुरती योजना रोखली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ मुंबई**

मध्य प्रदेशच्या निवडणुकीत टर्निंग पॉईंट ठरलेली आणि महाराष्ट्राच्या निवडणुकीत टर्निंग पॉईंट ठरू शकणारी लाडकी बहीण योजनेबाबत महत्वाची माहिती आली आहे. दिवाळी बोनस आणि पुढील हप्त्याची वाट पाहणाऱ्या लाडक्या बहिणींना पैसे येणार नाहीत. निवडणूक आयोगाने ही योजना तात्पुरती बंद केली आहे.

महाराष्ट्रात काही महिन्यांपूर्वी एकनाथ शिंदे सरकारने लाडकी बहीण योजना सुरु केली होती. याद्वारे महिलांना महिन्याला दीड हजार रुपये दिले जात होते. यासाठी आतापर्यंत जवळपास २.४ कोटी महिलांना पाच महिन्यांचे पैसे मिळाले होते. यातच शिंदे सरकारने दिवाळी बोनसही जाहीर केला होता. याबरोबरच पुढील महिन्याचे पैसेही दिले जाणार होते. याची महिला वाट पाहत असताना निवडणूक आयोगाने निवडणूक काळात या योजनेचे पैसे पाठविण्यावर बंदी आणली आहे.



केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा केली आहे. यामुळे राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. यामुळे या काळात मतदारांना थेट प्रभावनित करणाऱ्या आर्थिक योजना बंद करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. या आदेशांनंतर महिला व बाल कल्याण विभागाने लाडकी बहीण योजनेचा पैसा रोखला आहे. यामुळे पुढील दोन महिने या योजनेचे पैसे महिलांना मिळणार नाही. यामुळे आता या महिलांना डिसेंबरच्या हप्त्याची वाट पहावी लागणार आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम यांनी सर्व विभागांना याबाबत विचारणा केली होती. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ दिला जात असल्याचे समोर आले होते. यामुळे या योजनेची विस्तृत माहिती मागविण्यात आली आहे. चार दिवसांपूर्वीच या योजनेचा पैसा रोखण्यात आल्याचे विभागाने निवडणूक आयोगाला कळविले आहे. याबाबतचे वृत्त एनबीटीने दिले आहे.

**दिवाळी बोनसचे काय?**

लाडक्या बहिणीला निवडणुकीच्या तोंडावर खूश करण्यासाठी शिंदे सरकारने दिवाळी बोनसची घोषणा केली होती. याद्वारे ३००० रुपयांचा बोनस दिला जाणार होता. परंतू, निवडणूक आयोगाच्या कारवाईनंतर लाडक्या बहिणीला आता हा दिवाळी बोनस मिळणार नाही. तसेच डिसेंबरमध्ये दिवाळी बोनस मिळेल की नाही याची काहीही शाश्वती नाहीय.

## दहा लाख काढल्यास 'आयकर' ला माहिती द्या; सहकार विभागाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सहकारी पतसंस्थेतून एकाच दिवशी रोख १० लाख रुपये काढल्यास त्याची माहिती सायंकाळी पाच वाजेपर्यंत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला कळवणे बंधनकारक करण्यात आले आहे. निवडणुकीच्या दरम्यान रोख पैशांची ने-आण, वितरण, आमिषे म्हणून पैशांचे वाटप यावर बंधने आणण्यासाठी ही एक उपाययोजना करण्यात आली आहे.



नागरी बँकांवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असते, तर नागरी सहकारी पतसंस्था या महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असतात. त्यामुळे पतसंस्थांमधील कारभारामध्ये अनेकवेळा मागे, पुढे होते. त्यामुळे बहुतांशी राजकीय नेत्यांनी आपल्या पतसंस्था काढल्या आहेत. बँकांमध्ये ठेव ठेवताना ठेवींसाठी आधारकार्डापासून पॅनकार्डही मागितले जाते, परंतु त्या तुलनेत पतसंस्थांमध्ये तितके नियम काटेकोरपणे पाळले जातातच असे नाही. त्यामुळे पतसंस्थेच्या माध्यमातून हवा तितका पैसा काढणे आणि भरणे सहज शक्य असते.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका लागल्यामुळे रोख रक्कम काढण्यावर आणि भरण्यावर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. सहकार आयुक्तांनी ७ ऑक्टोबर २४ रोजी याबाबत परिपत्रक काढले असून, त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हा उपनिबंधकांनी उप, सहायक निबंधकांना याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.

**रोजच्या रोज तक्ता भरायचा**

तालुक्यातील ज्या संस्थेमध्ये १० लाख रुपयांचा भरणा केला असेल किंवा पैसे काढले असतील, तर त्याची माहिती तालुका कार्यालयाला द्यायची आहे. येथून ही माहिती सायंकाळी पाच वाजेपर्यंत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला पाठवण्यात येईल. जिल्ह्याला माहिती संकलित करून आयकर विभागाला पाठवली जाणार आहे.

## विधानसभेसाठी पवारांचे संभाव्य ४० शिलेदार ठरले; वाचा कुणा-कुणाला लागली उमेदवारीची लॉटरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ मुंबई**

राज्यात आता महायुती आणि महाविकास आघाडीचे जागावाटप अंतिम टप्प्यात आले आहे. दोन्ही आघाड्यांच्या नेत्यांकडून तसा दावा केला जात आहे. महायुतीच्या जागावाटपाची चर्चा वेगाने पुढे सरकत आहे. महाविकास आघाडीकडूनही वेगात हालचाली सुरू झाल्या आहेत. जागावाटप अंतिम टप्प्यात असून काही उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचं सांगण्यात येत आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचेही जवळपास ४० संभाव्य उमेदवार निश्चित झाल्याची माहिती मिळाली आहे. अद्याप या उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र तिकीट याच शिलेदारांना मिळेल असे सांगण्यात येत आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या संभाव्य उमेदवारांची यादी समोर आली आहे. ४० उमेदवारांची यादी असून यामध्ये कोणत्या मतदारसंघात कोण उमेदवार असणार? याबाबतची माहिती समोर आली आहे.



**संभाव्य उमेदवार यादी पुढीलप्रमाणे**

इस्लामपूर- जयंत पाटील,तासगाव कवठे महांकाळ- रोहित पाटील शिराळा- मानसिंग नाईक,उत्तर कराड- बाळासाहेब पाटील,कोरेगाव- शशिकांत शिंदे,फलटण - दीपक चव्हाण,माण खटाव- प्रभाकर देशमुख,शिरुर- अशोक पवार,जुन्नर- सत्यशील शेरकर इंदापूर- हर्षवर्धन पाटील,आंबेगाव- देवदत्त निकम,वडगाव शेरी- बापू पठारे,दौंड- रमेश आप्पा थोरात, माळशिरस- उत्तमराव जानकर,कर्जत जामखेड- रोहित पवार,काटोल- अनिल देशमुख, विक्रमगड- सुनील भुसारा,घनसावंगी - राजेश टोपे,बीड- संदीप क्षीरसागर,मुंब्रा- जितेंद्र आव्हाड,जिंतूर- विजय भांबळे,अहेरी- भाग्यश्री अत्राम,सिंदखेड राजा- राजेंद्र शिंगणे,उदगीर- सुधाकर भालेराव, घाटकोपर पूर्व- राखी जाधव,परळी- राजाभाऊ पड,लक्ष्मण पवार- गेवराई,आष्टी- भीमराव धोंडे, केज- पृथ्वीराज साठे,माजलगाव- रमेश आडसकर,राहुरी- प्राजक्त तनपुरे,देवळाली- योगेश घोलप,दिंडोरी - गोकुळ झिरवाळ,मुक्ताईनगर - रोहिणी खडसे,जामनेर- गुलाबराव देवकर, अकोला- अमित भांगरे,पारनेर- राणी लंके,खानापूर - सदाशिव पाटील,चंदगड- नंदाताई बाभूळकर, इचलकरंजी- मदन कारंडे

## बेकायदेशीर शुल्क उकळणाऱ्या राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयाविरोधात चौकशीचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९वर्धा**

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे राज्यातील विविध शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस व बीडीएस अश्या पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सूरू आहे. खासगी महाविद्यालयात सुमारे १५ टक्के जागा या संस्थागत कोट्यातून प्रवेशासाठी राखीव ठेवल्या जातात. हि प्रवेश प्रक्रिया सूरू होण्यापूर्वी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या शुल्क नियमन प्राधिकरणाकडून खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविल्या जाते. त्यात शैक्षणिक शुल्क तसेच विकास शुल्क याचा समावेश असतो. संस्थागत कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी नियमित शुल्कच्या तीन पट शुल्क आकरण्याचा निर्णय झाला आहे. संबंधित महाविद्यालयानी तशी माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारणे अपेक्षित आहे. मात्र दोन कॅप प्रवेश फेऱ्यांचे निरीक्षण केल्यावर संस्थागत कोट्याच्या जागा काही खासगी महाविद्यालयात जैसे थे असल्याचे दिसून येत आहे.

या जागांवर प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या आर्थिक क्षमतेनुसार अर्ज दाखल केले होते.



त्यांच्या गुणवत्तेनुसार या विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थागत कोट्यात घोषित झाले. विद्यार्थी प्रवेशासाठी गेले. मात्र विविध कारणे देत त्यांना प्रवेश नाकारण्यात आला. त्यामुळे या जागा पहिल्या व दुसऱ्या फेरीत रिक्त राहल्या. या सर्व प्रक्रियेत मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला. हितसंबंध जोपसण्यासाठी ठराविकच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्यामुळेच नियमाप्रमाणे प्रवेश मिळालेल्या विदयार्थ्यांना टाळण्यात आले, असा आरोप करीत शिवसेनेचे कल्पेश यादव यांनी या प्रकाराची चौकशी करीत प्रवेश प्रक्रियेचा अहवाल घ्यावा, अशी मागणी केली होती. तसेच वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालाय यांच्याकडे तक्रार केली. त्यानुसार घडामोड झाली आहे. संचालनालाय व आयुषच्या आयुक्त कार्यालयाने या तक्रारीची चौकशी करण्याचे आदेश शासकीय वैद्यकीय महाविद्यालयच्या अधिष्ठात्यांना दिले आहेत. तसेच पुढील आठ दिवसात याबाबतचा अहवाल संचालक कार्यालयास सादर करण्याची सूचना आहेत.

**ही कॉलेज आहेत रडारवर**

श्रीमती काशीबाई नवले मेडिकल कॉलेज पूणे, माईर्स मेडिकल कॉलेज तळेगाव दाभाडे, अश्विनी मेडिकल कॉलेज सोलापूर, एमआयएमएसआरएस मेडिकल कॉलेज लातूर, तेरणा मेडिकल कॉलेज नवी मुंबई, वेदांता मेडिकल कॉलेज पालघर, डॉ. एन.वाय. तासगावकर इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स कर्जत, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज पूणे, प्रकाश इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च इस्लामपूर सांगली.

## महायुतीचा मुंबईतल्या जागांचा फॉर्म्युला ठरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

राज्यात विधानसभा निवडणुका जाहीर होऊन चार दिवस उलटले पण अजूनही महायुती आणि महाविकास आघाडीचे जागावाटप झालेलं नाही. याबाबत बैठकांचे सत्र सुरूच आहे. दरम्यान, आता महायुतीबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. महायुतीचे मुंबईतील जागावाटपावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मुंबईत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला तीन जागा मिळाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला तीन जागा सोडण्यात येणार आहेत. अनुशक्ती नगर, वांद्रे पूर्व, शिवाजी मानखुर्द हे तीन विधानसभा मतदारसंघ सोडण्यात आल्याचे बोलले जात आहे. तर दुसरीकडे मुंबईमध्ये भाजपाला १८ जागा सोडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

मुंबईत भाजपाला १८ जागा सोडण्यात आले असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना मुंबईत १५ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस ३ जागा लढणार असल्याचे बोलले जात आहे.

## संपादकीय ......

# भारताकडून शांतता, स्थैर्याची हाक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच लाओस येथे दोन दिवसीय परिषदेमध्ये घेतलेला सहभाग निर्णायक ठरला आहे. 'आसियान'ची ही २१ वी परिषद होती आणि पूर्व आशिया शिखर परिषदेची ही १९ वी बैठक होती. दोन युद्धांमुळे ग्रासलेल्या अस्थिर व तणावग्रस्त जगाच्या पार्श्वभूमीवर लाओस परिषदेत भारताने शांतता, स्थैर्य व समृद्धीची हाक दिली आहे. या परिषदेत झालेले विचारमंथन नव्या जगात बदलत्या आशियाचे प्रतिबिंब उमटविणारे आहे. २१ वे शतक हे आशियाचे शतक आहे.

इस्रायल-हमास युद्ध आणि युक्रेन-रशिया युद्ध या युद्धांमुळे सबंध जग तणावग्रस्त असताना आशिया खंडामध्ये मात्र भारताने नवा १० कलमी विकास कार्यक्रम देऊन नवे मन्वंतर घडविले आहे. सबंध दक्षिण आशियाई देशांनी भारतीय विचारांचे स्वागत केले. या देशांनी परस्परातील संपर्क आणि लवचीकता मजबूत करण्यासाठी भारताने घोषित केलेला दशसूत्री कार्यक्रम स्वीकारला आहे व त्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. आग्नेय आशियाई देशांनी भारताशी असलेले संबंध अधिक विस्तृत करण्यासाठी विविध योजनांचे स्वागत केले आणि भारताच्या सकारात्मक दृष्टीविषयी आभार मानले. डिजिटल पायाभूत सार्वजनिक सुविधांबाबत भारताने पुढे केलेला सहकार्याचा हात सर्व देशांनी स्वीकारला आहे. त्यामुळे या सर्व देशांमध्ये रचनात्मक परिवर्तनाला एक नवी दिशा मिळाली आहे. आगामी वर्ष केवळ आसियान पर्यटन वर्ष म्हणून जाहीर केले नाही, तर त्यासाठी ५ दशलक्ष डॉलरची मदत करून सर्व उपक्रमांना सक्रिय करण्याच्या दृष्टीने शाश्वत विकासाच्या दिशेने एक नवे पाऊल टाकले आहे.

भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणाला १० वर्षे पूर्ण झाल्यामुळे या परिषदेच्या फलश्रुतीचे मूल्यमापन करणे अगत्याचे ठरू शकेल. भारताला आर्थिक, सांस्कृतिक आणि व्यावहारिक दृष्टीने आसियान परिषदेचे भरीव फायदे झाले आहेत. विशेषतः प्राचीन काळातील सांस्कृतिक संबंध अधिक मजबूत होऊन ते दृढ होण्याच्या दिशेने नवी पावले टाकली जात आहेत. लाओसमधील व्हॅट फू या भारतीय प्रभाव असलेल्या प्राचीन बौद्ध स्मारकाचा जीर्णोद्धार करण्याचे काम भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने पूर्ण केले आहे. भारताच्या या योगदानामुळे लाओसमधील जनता प्रसन्न असून, ती भारतीय पर्यटकांचे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. लोकपातळीवरील संपर्काचा विचार करता लाओसमधील पर्यटकही भारतातील बौद्ध स्थळांना भेट देण्यासाठी उत्सुक आहेत.

ॲक्ट ईस्ट धोरणामागील पुनश्च सांस्कृतिक सुसंवादाचे पुनरुज्जीवन हा सिद्धांत मोठा महत्त्वाचा आहे. आसियान शिखर परिषदेचा उद्देश मोठा मौलिक, दूरदृष्टीचा आणि उज्ज्वल भविष्याला गवसणी घालणारा आहे. या द्वैवार्षिक परिषदेमध्ये सर्वसमावेशक विकास भागीदारीचा योजकतेने प्रयत्नपूर्वक आढावा घेतला जातो. भावी सहकार्याची क्षेत्रे आणि उद्दिष्टे ठरविली जातात व त्या दृष्टीने भागीदारीची रचना केली जाते. प्रादेशिक विकासाच्या विविध मुद्द्यांवर विचार करण्यासाठी हे व्यासपीठ एक संधी प्रदान करते. धोरणात्मक दृष्टीने पोषक असे विकासाचे वातावरण तयार करण्यासाठी ही परिषद एक प्रभावी व्यासपीठ म्हणून उदयास आली आहे. न्यूझीलंडचे पंतप्रधान लुक्सन यांना पंतप्रधान मोदी यांनी कलाकुसरी, मौलिक शिल्प आणि चांदीच्या कोल्हापुरी कलेनेयुक्त असा एक सुंदर चांदीचा दिवा भारताच्या मैत्रीचे प्रतीक म्हणून भेट दिला आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील ही चांदीवरील सूक्ष्मकला कालातीत, अजरामर आणि अपूर्व अशी आहे. भारताला बुलेट ट्रेन देणार्या जपानचे पंतप्रधान इशिबा यांनाही मोराची राजस कलाकृती भेट दिली आहे. मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी असून, चांदीची कलाकुसर असलेला हा मोर बंगालमधील सूक्ष्म काम करणार्या कारागिरांनी बनविला आहे. थायलंडच्या युवा पंतप्रधान पायटोंगटर्न शिनावात्रा यांना हिमालयीन लाकडी कलाकृती भेट देऊन त्यांचा गौरव केला. लडाखमधील कुशल कारागिरांनी बनविलेला हा लाकडी मेज कमी उंचीचा, नक्षीयुक्त, आकर्षक आणि रंगीत असा आहे. लडाखचे हे पारंपरिक कलाशिल्प महत्त्वाचे आहे. लाओसचे पंतप्रधान सोनेक्से सिफांडोन आणि राष्ट्रपती थोंग्लोन सिसोलिथ यांना पिंपळाच्या वृक्षापासून बनलेली गौतम बुद्धांची प्रतिमा भेट दिली. ही प्रतिमा म्हणजे दक्षिण भारतातील तामिळनाडू येथील लाकडी शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

भारत-लाओसदरम्यान झालेल्या करारामध्ये सहा प्रमुख बाबींचा समावेश आहे. आर्थिक भागीदारी, संरक्षण, नवीकरणीय ऊर्जा, पर्यटन विकास, वारसा संवर्धन, मुक्त व्यापार, शिक्षण व संशोधन, लोकसंपर्क अशा अनेक क्षेत्रांत परस्पर सहकार्यावर भर दिला आहे. भारताच्या १० कलमी विकास घोषणापत्रामध्ये काही महत्त्वाच्या घटकांचा समावेश आहे. त्यापैकी एक प्रमुख पैलू म्हणजे, २०२५ हे वर्ष आसियान भारत पर्यटन वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यासाठी ५ दशलक्ष अमेरिकन डॉलरची मदत करण्यात आलेली आहे; परंतु या बरोबरच इतर काही घटकांचाही त्यात समावेश आहे. त्यामध्ये प्रामुख्याने आसियान भारत विज्ञान आणि तंत्रज्ञान निधी ही एक मोठी महत्त्वाकांक्षी उपलब्धी आहे. त्या माध्यमातून आसियान-भारत महिला वैज्ञानिक परिषद आयोजित केली जाणार आहे. आंतरराष्ट्रीय नालंदा विद्यापीठात शिकायला येणार्या आसियान देशांतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट केली जाणार आहे. तसेच या विद्यार्थ्यांना सर्व काही सेवा-सुविधा पुरविल्या जाणार आहेत. आसियान देशांतील विद्यार्थ्यांना भारतामध्ये कृषी विद्यापीठात शिकण्यासाठी मौलिक शिष्यवृत्ती योजना आखण्यात येणार आहे.

---

आरोग्य संपदा आहार

## बहुलाभदायी अक्रोड

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक**

ड्रायफ्रूटस्मधील मेंदूच्या आकाराचे अक्रोड हे अतिशय गुणकारी आहे. यामध्ये भरपूर प्रमाणात असलेले ओमेगा ३ मेदाम्ल हे अँटिऑक्सिडंट असल्याने त्याचा शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो.

संशोधकांच्या म्हणण्यानुसार अक्रोड आणि अक्रोडाचं तेल या दोन्हींचा उपयोग ताण कमी करण्यासाठी होतो.

अक्रोड आहारात असतील तर ज्याचं वजन जास्त आहे, अशांना फायदा होतो. रक्तवाहिन्या चांगल्या स्थितीत राहतात.

अक्रोडातील ९० टेफेनॉल्स त्याच्यावरील पातळ सालीत असतात. फ्लेवनॉईडसमुळे अँटिऑक्सिडंट गुणधर्म वाढतात, त्यामुळे अक्रोड खाताना या सालीसकट खावा. शक्यतो पाण्यात भिजत ठेवून पूर्ण भिजला की खावा. पाण्यात भिजवल्यावर त्यातील प्रथिनांचे रेणू शोषून घेतात.

अक्रोडातील भरपूर प्रमाणात असलेलं 'इ' जीवनसत्त्व एका वेगळ्या स्वरूपात म्हणजे गॅमा टोकोफेरॉल या रसायनाच्या स्वरूपात असतं. खास करून पुरुषांच्या हृदयाच्या आरोग्यास यामुळे हातभार लागतो.

अक्रोड आहारात असल्याने तंतू, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, तांबे यांचाही लाभ झाल्याने संधिवातालाही प्रतिबंध होण्यास मदत होते. अक्रोडामध्ये आणखी असे गुणधर्म आहेत, ज्यामुळे रक्तवाहिन्यांमधील लवचीकता टिकून राहते.

अक्रोड मेंदूसाठीही उत्तम समजला जातो, यामुळे रक्तात गाठी होण्याचं प्रमाण कमी होतं.

**अक्रोडाचं तेल** –अक्रोड पूर्णपणे वाळून त्याची पेस्ट करून ती भाजून मग त्यापासून तेल काढलं जातं. ते सुंदर



तपकिरी रंगाचं असतं. या तेलात एलॅजिक आम्ल हा अँटिऑक्सिडंटचा स्रोत असतो, यामुळे कर्करोगाला प्रतिबंध होतो.

रक्ताभिसरण उत्तम राहण्यास, रक्तवाहिन्या लवचीक राहण्यास, हृदयविकारास प्रतिबंध होण्यास, संधिवातास प्रतिबंध होण्यास या तेलाचा चांगला उपयोग होतो.

या तेलातील 'ब' जीवनसत्त्वाचे प्रकार आणि 'इ' जीवनसत्त्व यामुळे त्वचेचा पोत सुधारतो. त्वचेवरील सुरकुत्या, अकाली वार्धक्य, एक्झिमा, सोरायसिस यावर अक्रोडाच्या तेलाचा चांगला उपयोग होतो.

---

# रब्बी पिकांचं उत्पादन वाढवायचं, 'ही' पंचसूत्री लक्षात ठेवा !



विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक** – रब्बी पिकांचे जास्तीत जास्त उत्पादन मिळवण्यासाठी जमिनीची पूर्वमशागत, सुधारित जातींचा वापर, संतुलित खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन व पीक संरक्षण या पंचसूत्रीचा अवलंब करावा. याबाबत सविस्तर या लेखातून जाणून घेऊयात..

**जमिनीची पूर्व/आंतरमशागत** – शक्य असल्यास पीक लागवडीपूर्वी हिवाळी नांगरट करावी, मात्र जमिनीतील ओल उडून जाणार नाही याची काळजी घ्यावी. नांगरणीनंतर जमीन भुसभुशीत करून घ्यावी कारण अशा जमिनीत बी चांगले रुजून त्याची उगवणही चांगली होते. आंतरमशागतीमध्ये उभ्या पिकात केलेल्या खुरपणी व कोळपणीमुळे तणांचा बंदोबस्त तर होतोच तसेच जमिनीतील भेगा बुजवल्या जाऊन जमिनीची ओलावा धरून ठेवण्याची क्षमता वाढते. विरळणी करून हेक्टरी योग्य रोपांची संख्या ही राखावी.

**सुधारित जातींचा वापर** –जास्त उत्पादन देणाऱ्या, रोग-किडींना कमी बळी पडणाऱ्या सुधारित जातींच्या वापराबरोबरच बियाणाचे शिफारस केलेले हेक्टरी प्रमाण वापरणे गरजेचे असते. शिफारस केलेले पेरणीचे अंतर तसेच पेरणीची योग्य वेळ साधणे अपेक्षित उत्पादन मिळवण्यासाठी महत्त्वाचे असते.

**संतुलित खत व्यवस्थापन**– पिकांच्या सुधारित जातींना शेणखत, कंपोस्ट खत किंवा जिवाणू खत योग्य मात्रेत दिल्याने रब्बी पिकांचे अपेक्षित उत्पादन मिळविता येते. सहसा युरिया खताचा जास्तीत जास्त वापर केला जातो तसे न करता रब्बी पिकास शिफारस केल्याप्रमाणे नत्र, स्फुरद व पालाश या खतांची संतुलित मात्रा देणे गरजेचे असते.

**पाणी व्यवस्थापन** – बागायती पिकांसाठी जमिनीच्या प्रकारानुसार, पिकांच्या संवेदनक्षम अवस्थांनुसार विशिष्ट अंतराने तसेच योग्य मात्रेत पाणीपुरवठा करणे गरजेचे असते. फुलोरा व दाणे भरण्याच्या अवस्था पाणी देण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असतात. तसेच आवश्यकतेपेक्षा जास्त दिलेले पाणी पिकास फायदेशीर ठरण्याऐवजी हानिकारक ठरते.

**पीक संरक्षण** – सगळे सूत्र वापरूनही पिकाचे कीड आणि रोगापासून संरक्षण केले गेले नाही तर पिकाचे उत्पादन जवळपास ४०% घटते म्हणून पिकाचे जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्याच्या दृष्टीने पिकांवरील कीड व रोगांचा योग्य वेळी, योग्य प्रकारे बंदोबस्त करणे गरजेचे असते. रासायनिक कीड व रोग नाशकांना झालेली प्रतिकारक्षमता लक्षात घेता पिकांसाठी एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापनाचा अवलंब करावा.

**– डॉ. कल्याण देवळाणकर,** सेवानिवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ

---

# महायुती ने बंजारा समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला..



**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक**

धर्मगुरु पू मा.आमदार बाबूसिंग महाराज हे नाव विधानपरिषदेच्या निमित्ताने आज जरी महाराष्ट्र व भारतातील इतर समाजाला परीचयाचे झाले असेल तरी सकल भारतातील बंजारा समाजाला हे नाव नवीन नाही. अखंड ब्रम्हचारी पूज्य रामराव बापू यांची अविरत सेवा पूज्य बाबूसिंग महाराजांच्या हातून घडली त्यांच्या हयातीत ते त्यांच्या सोबत सावलीसारखे राहिले. जगदंबा माता, संत श्री सेवालाल महाराज, स्वर्गवासी पू.रामराव महाराज यांच्या आशीर्वादाने आज बंजारा समाजाला खूप काही मिळताना दिसत आहे. भारताचे लाडके पंतप्रधान, जागतिक नेतृत्व नरेंद्र मोदी जी हे बणजारा समाजाची काशी श्रीक्षेत्र पोहरादेवी गड येथे दर्शनाला आले, त्यांनी पू. रामराव बापू यांची इच्छा पूर्ण करून सकल बणजारा समाजाला सन्मानित केले.

१) श्रीक्षेत्र पोहरादेवी गडाच्या विकास कामासाठी ७०० कोटी रुपये इतका निधी बहाल केला. 'नंगारा भवन' स्थापन झाले, त्याचे भव्यदिव्य उद्घाटन समारंभ मोदिजींच्या शुभहस्ते व महाराष्ट्राचे राज्यपाल तसेच मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

२) ❋केंद्र स्थरावर बणजारा कल्याण मंडळाची स्थापना.❋पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः लोकसभेत याची घोषणा केली. या मंडळाच्या माध्यमातून भारतभर विखुरलेल्या वंचित समाजाला मुख्य प्रवाहात येण्याची संधी प्राप्त झाली आहे. या निर्णयाने समाजाच्या विकासाला गती मिळेल यात शंका नाही.

३)'तांडा समृद्धी योजना'महाराष्ट्र मध्ये महायुती सरकारने 'तांडा समृद्धी योजना' उदयास आणली त्या योजने अंतर्गत प्रत्येक जिल्हा व तालुक्याला ४ अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली. १३० कोटी निधीचा पहिला टप्पा बहाल करून विकास कामे सुरु देखील झाली. यात हजारो कोटींची तरतूद केंद्र सरकारने देखील केली आहे.

४) तांड्यांना ग्रामपंचायत व महसुली दर्जा देण्यसाठी १००० लोकसंख्येची अट शिथिल करून ती ७०० लोकसंख्येची केली. ग्रुप ग्रामपंचायत मुळे विकासापासून वंचित राहिलेल्या तांड्याचा विकासाचा मार्ग मोकळा झाला.

५) 'गोर बणजारा साहित्य अकादमी'बणजारा समाजाचा इतिहास हा हजारो वर्षापूर्वीचा आहे परंतू लीखित स्वरुपात काहीही नाही. गोर संस्कृतीचे जतन व्हावे व पुढच्या पिढीला समाजाची अनुभूती यातून मिळवू यासाठी सरकारने 'गोर बणजारा साहित्य अकादमी' सुरू केली आहे.

६) भामटा राजपूत (डखढ) स्थापन❋ – समाजाच्या आरक्षणाचा फायदा घुसखोर खोटे दाखले काढून घेत आहेत. अश्या अनेक घटना समोर आल्या त्यावर चौकशी होऊन कारवाई व्हावी यासाठी समिती गठित व्हावी अशी मागनी अनेक वर्षांपासून जोर धरत होती ती मागणी देखिल सारकर ने मान्य केली आहे व विशेष तपास समिती (डखढ) स्थापन केली आहे.

७) पू.बाबूसिंग महाराज यांची राज्यपालांनी विधान परिषदेवर घेवून सन्मानित केले खरंतर कोणतीही आमदारकी खासदारकी मंत्री पद हे कोणत्याही समाजाच्या धर्म गुरूंना तुच्छच असते. बंजारा समाज तर करोडोच्या संख्येने भारत भरात विखुरलेला आहे. त्या समाजाचे धर्म गुरु हे पू. बाबूसिंग महाराज आहेत. कलम १७१-५ नुसार विधान परिषदेवर सदस्य (आमदार) म्हणून काही सदस्यांची निवड हे राज्यपाल करत असतात. त्यात सामाजिक, साहित्य, कला, विज्ञान क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना निवडतात. या तरतुदी नुसार पू.बाबूसिंग महाराजांची नियुक्ती झालेली आहे हे समाजाने लक्षात घ्यावे. या नियुक्तीच्या द्वारे सकल बणजारा समाजाला सन्मानितच करण्यात आले आहे. विधान परिषदेवर राहून पू. बाबूसिंग महाराज बणजारा समाजाच्या विलक्षण संस्कृतीचे दर्शन हे भारताला घडवून आणतील हे मात्र नक्की. इतर ठिकाणी देखील अनेक संत महात्मे हे राजकारणात संविधानिक पदावर आहेतच उत्तर प्रदेश चे मुख्यमंत्री महंत योगी आदित्यनाथजी, राजस्थान मध्ये बाबा बालकनाथ, साध्वी निरांजन ज्योती, उमा भारती, आचार्य प्रमोद कृष्णन असे अनेक उदाहरण आपल्याला वेगवेगळ्या पक्षात बघायला भेटतील. तसेच अन्य क्षेत्रातीलही अनेक नावे असे सांगता येतील जसे सचिन तेंडुलकर, सुधा मूर्ती, लता मंगेशकर. समाजाचा विकास हा धार्मिक आणि राजकीय दोन्ही अंगाने झाला तरच समाज पुढे जातो आणि पू.बाबूसिंग महाराज ते घेऊन चालतील. समाजाचे प्रश्न योग्य रित्या मांडतील व ते इतर कोणीही मांडण्यापेक्षा प्रभावी व लक्षवेधी ठरेल हे मात्र नक्कीच.बणजारा समाजाला साठी मागील ७० वर्षांमध्ये जे झाले नाही ते महायुती सरकारच्या काळात एका पाठोपाठ एक निर्णय घेऊन बंजारा समाजाला खर्या अर्थाने न्याय देण्याचे काम केले आहे. या बद्दल संपूर्ण समाजात सर्वत्र आनंद व समाधान व्यक्त केले जात आहे. महायुती व विशेष करून भाजपाचा कायम कृतज्ञ राहील. **– डॉ. आकाश राठोड**

---

# महिला महाविद्यालयात वैश्विक मानवी मुल्ये कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, अमरावती द्वारा संचालित महिला महाविद्यालयातील राज्यशास्त्र,इतिहास,अर्थशास्त्र व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने ०४ आक्टोबर २०२४ रोजी वैश्विक मानवी मुल्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महिला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. मंजुषा धापुडकर व प्रमुख मार्गदर्शक व वक्ते म्हणून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक डॉ.संदीप ताटेवर हे उपस्थित होते. प्रमुख वक्ते आपले विचार मांडताना म्हणाले की, मानवी मूल्ये ही सार्वत्रिक संकल्पना आहे. जी मानवी जीवनासंबंधी, मानवी वर्तनासंबंधी मार्गदर्शन करतात. सत्य, अहिंसा सदाचार, न्याय ,स्वातंत्र्य, समता ,बंधुता, सहकार्य, सहिष्णुता ही मानवी मूल्ये आहेत. विद्यार्थ्यांमध्ये ही मूल्य रुजविण्यामध्ये शाळा महाविद्यालयाची जशी भूमिका आहे तेवढीच महत्त्वाची भूमिका कुटुंबाची देखील एक सृजान, सक्षम, जागरूक आणि मानवतावादी नागरिक घडण्याकरिता या मूल्यांची नितांत आवश्यकता आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्रा. डॉ. मंजुषा धापुडकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. त्या आपले विचार मांडताना म्हणाल्या की, मानवी मूल्ये ही बुद्ध तत्त्वज्ञानाच्या जवळ जाणारी आहेत. मानवी मूल्य ही वैश्विक स्तरावर कार्यरत असतात, त्यामुळे मानवी मूल्यांचा आदर आपण सर्वांनी केला पाहिजेत. यासोबतच इतिहासाची मांडणी करताना त्यांनी ऐतिहासिक दाखले आणि उदाहरणे विद्यार्थ्यांसमोर ठेवली. यासोबतच सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. माधुरी सोनपरोते उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा संचालन राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रवीण गुल्हाने यांनी



केले. या कार्यक्रमात वक्त्याचा परिचय प्रा.डॉ. अर्चना पोले यांनी करून दिला. तर प्रा. रुपेश राठोड यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. जगबंधू वानखडे, प्रा. डॉ. शारदा घाटोळ तसेच या कार्यक्रमाला महिला महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यलयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १९ ऑक्टोबर २०२४

शहर/ग्रामिण


## उमेदवारी मिळवण्यासाठी आता आम्हाला विनवणी करावी लागत हे दुर्दैव - तुषार भारतीय





### संवाद बैठकीत भारतीयांचे जोरदार शक्तिप्रदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

`स्वाभिमानाने आम्ही भारतीय जनता पक्षाचा अमरावती आणि बडनेरा विधानसभा मतदारसंघात विस्तार केला. त्यासाठी आम्ही लाठीमार पचवला आणि गल्लो-गल्ली फिरलो. मात्र त्याच पक्षाकडून विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळवण्यासाठी आता आम्हाला विनवणी करावी लागत आहे. पक्ष कुणा दुसऱ्यासाठी रेड कार्पेट अंथरण्यात व्यस्त आहे, हे आमचे दुर्दैव आहे. जर आपल्यात राज्याभिषेककरण्याची ताकद असेल तर आम्ही मुकुट उतरविण्याचा सुद्धा दम ठेवतो, अशा शब्दात तुषार भारतीय यांनी बडनेरा विधानसभा मतदारसंघातीलकार्यकर्त्यांच्या बैठकीत पुन्हा हल्लाबोल चढविला. उल्लेखनीय असे की, शहर भाजपच्या वतीने बडनेरा विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांची शुक्रवारीशुभम मंगल कार्यालयात संवाद बैठक बोलावण्यात आली होती. मात्र, या बैठकीच्या निमंत्रण पत्रिकेनुसार शहराध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीला जयंत डेहनकर, शिवराय कुलकर्णी, किरण पातुरकर, दिनेश सूर्यवंशी आणि डॉ. नितीन धांडे, चेतन पवार आदी मान्यवर उपस्थित राहणार होते. मात्र हे सर्व गैरहजर होते. बैठकीला तुषार भारतीय यांच्याशिवाय प्रा. रवींद्र खांडेकर, प्रशांत शेगोकार, चेतन गावंडे, किरणताई महल्ले, निवेदीताईचौधरी, कौशिक अग्रवाल, बलदेव बजाज सहप्रमोद खंदारे यांच्यासह भाजपचे माजी नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते. बडनेरा विधानसभा मतदारसंघातून तुषार भारतीय यांच्या उमेदवारीला पाठिबा देण्यात आल्याचे बैठकीत प्रामुख्याने सांगण्यात आले. व मात्र, बैठकीला शहर भाजपचे प्रमुख अधिकारी व नेत्यांची अनुपस्थिती स्पष्टपणे दिसून आली.बैठकीत प्रा. रवींद्र खांडेकर म्हणाले की, तुषार भारतीय यांनी भारतीय जनता पक्ष मजबूत करण्यासाठी खूप काम केले असून का बडनेरामधून त्यांच्या उमेदवारीला आपला पाठिबा आहे. तुषार भारतीय यांनी त्यांच्या महानगरपालिकेच्या कार्यकाळात बडनेरा विधानसभा मतदारसंघासाठी भरपूर निधी आणला आहे. या भागात भाजपच्या विस्तारासाठी तुषार भारतीय यांनी कंबर कसली आहे.

#### पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांचा अपमान

केलासभेत मुख्य प्रवक्ते तुषार भारतीय म्हणाले की, आतापर्यंत आम्ही जनतेच्या पुरेशा पालख्या उचलल्या आणि आता आम्ही भाजपकडे आमचा हक्क मागत आहोत. ते म्हणाले की, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना दहीहंडीच्या कार्यक्रमाचे निमंत्रण देऊन आमदार रवी राणा भाजपमध्ये येणार नसल्याचे सांगतात. पक्ष प्रदेशाध्यक्षांच्या या अपमानाचा बदला आम्ही नक्कीच घेऊ. प्रदेशाध्यक्षांना पक्ष सांभाळावा लागतो आणि वरिष्ठ नेत्यांचीही काळजी घ्यावी लागते. ते हा अपमान सहन करू शकतात पण आम्ही हा अपमान सहन करणार नसल्याचे ही भारतीय म्हणाले.

## शहरात गुन्हेगारांवरील कारवाई तीव्र

### तब्बल ४०० आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई



### सीआरपीएफच्या दोन तुकड्या शहरात दाखल अतिसंवेदनशिल परिसरात पहारा, पेट्रोलिंग करणार- सीपी नवीनचंद रेड्डी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

आगामी विधानसभा निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी आता गुन्हेगारी प्रवृत्तीवरील कारवाईची गती तिव्र केली आहे. निवडणूकीच्या अनुषंगाने शहरातील चारशे ते पाचशे आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. आता निवडणूकीच्या बंदोबस्तासाठी सीआरपीएफच्या दोन तुकड्या देखील अमरावतीत दाखल झाल्या आहेत. त्या अतिसंवेदनशिल परिसरात पहारा पेट्रोलिग करणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिली.

गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसविण्यासाठी आणि निवडणूक शांततेत पार पडावा, यासाठी पोलिस यंत्रणा अलर्ट झाली आहे. या यंत्रणा या गुन्हेगारांची तपासणीतून शत्र जप्तीची मोहिम सुरु केली आहे. हिस्ट्रीसिटर, रेकॉर्डवरील आरोपी, मारहाण प्रकरणातील गुन्हेगार यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई सुरु केली आहे. अमली पदार्थातील गांजा, एमडी व अन्य पदार्थ विक्री करणार्यांवर पोलिसांनी लक्ष केंद्रीत केले असून, तडिपारांची धरपकड सुरु केली आहे. आतापर्यंत ९ जणांविरुध्द एमपीडीएची कारवाई करण्यात आली असून, गेल्या वर्षीपासून आतापर्यंत १५ जणांना एमपीडीए जेलमध्ये टाकण्यात आले आहे. निवडणूकीच्या अनुषंगाने सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणार्यांवर पोलिसांनी आता लक्ष केंद्रीत केले आहे, असी सीपी रेड्डी यांनी सांगितले. गुन्हेगारांवर वचक निर्माण व्हावी, यासाठी पोलिसांनी आता कंबर कसली आहे. निवडणूकीच्या अनुषंगाने शहरातील चारशे ते पाचशे आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. आता निवडणूकीच्या बंदोबस्तासाठी सीआरपीएफच्या शस्त्र जप्तीसह प्रतिबंधात्मक कारवाई सुरु केली आहे. अशा स्थितीत कारवाईच्या अनुषंगाने पोलिस अधिकारी किवा कर्मचारी दुर्लक्ष करतील, तर त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सांगितले.

## रोख वस्तू जप्तीबाबत जिल्हा तक्रार समिती गठीत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती** अमरावती जिल्ह्यातील सर्व विधानसभा क्षेत्रात जप्त करण्यात आलेली रोख रक्कम किंवा मौल्यवान वस्तू संदर्भात नागरिकांचे म्हणणे ऐकून त्यावर योग्य तो निर्णय घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा तक्रार समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीस तक्रारी सादर कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.



महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ची घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे.

त्यानुषंगाने निवडणुका शांततापूर्ण, भयमुक्त आणि पारदर्शकरित्या पार पाडण्यासाठी आयोगाने आदर्श आचार संहिता आखून दिली आहे. सदर निवडणूक काळात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे नियुक्त पथकाकडून संशयास्पद रोख रक्कम व मौल्यवान वस्तू जप्त करण्यात येतात, कोणतीही रक्कम किंवा मौल्यवान वस्तू या प्रथम खबरी अहवाल, तक्रारीशिवाय कोषागार, मालखाण्यात ठेवण्यात येतात. त्यामुळे आयोगाने आपल्या दि. २३ नोव्हेंबर २०२३च्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर 'जिल्हा तक्रार समिती' गठीत करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

सदर समितीचे सदस्य सचिव हे नोडल अधिकारी, खर्च संनियंत्रण पथक तथा सहायक संचालक विजय देशमुख आहेत. समितीमध्ये वरिष्ठ कोषागार अधिकारी शिल्पा राजेंद्र पवार सदस्य आहेत. सदर समिती भारत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीनुसार जनतेच्या तक्रारीवर सुनावणी घेवून निर्णय घेतील.

नागरीकांच्या तक्रारी असल्यास त्या समितीस सादर करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

## महाराष्ट्रातील निसर्ग पर्यटन स्थळांना मुबलक निधी; मेळघाट अन् पेंच वगळले

### ३२ स्थळांचा समावेश; चंद्रपूरला निधीसाठी झुकतं माप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती-** विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याअगोदर राज्य शासनाने राज्यातील ३२ निसर्ग पर्यटन स्थळांना ७२४५ कोटींचा भरघोस निधी दिला आहे. यामध्ये ताडोबासह विदर्भातील नऊ वनपर्यटन स्थळांचा समावेश आहे.

वनविभागाच्या क्षेत्रामध्ये पर्यटनाला चालना मिळावी, तसेच वनक्षेत्रातील पुरातन स्थळांचा पर्यटन म्हणून उपयोग करण्यासाठी अलीकडे वन विभागात निसर्गपर्यटन अर्थात जंगल सफारी, ऐतिहासिक गडकिल्ले, उद्यान अभयारण्य, व्याघ्र प्रकल्प, ईको पॉर्क ही संकल्पना तयार करण्यात आली आहे. याकरिता राज्य शासन २४०६-२२९५ मध्ये लेखाशीर्षातून दरवर्षी निधी उपलब्ध करून देत असते. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून निसर्ग पर्यटन स्थळांकरिता शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला नव्हता, हे विशेष. मात्र, निवडणुकीच्या तोंडावर निसर्ग पर्यटन विकास स्थळांना शासन पावल्याचे दिसून येते.



#### मेळघाट, बोर, पेंच, नवेगाव बांधला डच्चू-

राज्य सरकारने चंद्रपूर जिल्ह्यातील निसर्ग पर्यटन स्थळाकरिता भरपूर निधी दिला आणलेला असताना विदर्भातील सर्वांत मोठ्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला निधी मिळालेला नाही. याशिवाय बोर, पेंच आणि नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला निधी देण्यात आलेला नाही. राजकीय अनास्था व प्रशासकीय धोरण यासाठी कमी पडल्याचे स्पष्ट होते. यवतमाळ जिल्हातील टिपेश्वरला मात्र २०४.६० कोटी एवढा निधी मिळाला आहे. टिपेश्वर अभयारण्यास भरीव निधी मिळणार म्हणून विभागीय वनाधिकारी यांनी बदली झाल्यानंतर न्यायालयाचा स्थगनादेश आणून खुर्ची 'सहीसलामत' ठेवली ती याच साठी का? असा सवाल उपस्थित होत आहे.

## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धा २२ला

### भाऊसाहेबांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती-**

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीच्या संयुक्त विद्यमाने २२ ते २५ ऑक्टोबरपर्यंत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी (महिला) क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश राज्यातील ७४ विद्यापीठाच्या चमू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचा आस्वाद घेण्यासाठी २५०० आसन क्षमतेचे प्रेक्षागृह उभारण्यात आले असून चार मॅट ग्राउंडवर एकाच वेळी चार सामने होतील. अमरावतीत प्रथमच या स्पर्धांचे रात्रीच्या वेळी प्रकाशझोतात आयोजन केले आहे. स्पर्धेत उद्घाटनानंतर पहिल्या दिवशी ४० सामने खेळले जातील.

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर आयोजित या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मंगळवार, २२ ऑक्टोबरला सायंकाळी ६ वाजता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेत होणार असून, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख या सोहळ्याचे उद्घाटन करतील. जि. प. सीईओ संजीता महापात्र, पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, दिलीपबाबू इंगोले यांची प्रमुख उपस्थिती राहील.

दररोज रंगारंग कार्यक्रम सादर करण्यात येतील. शहरातील



कबड्डी प्रेमींसाठी ही मोठी पर्वणी असल्याने क्रीडाप्रेमी अमरावतीकरांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. पत्रपरिषदेला पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी (महिला) क्रीडा स्पर्धा समितीचे कार्याध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या प्रभारी संचालक डॉ. तनुजा राऊत, प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, संयोजक डॉ. सुभाष गावंडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व डॉ. कुमार बोबडे यांची उपस्थिती होती.

पाच राज्यातील संघ स्पर्धेत सहभागी आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, देवी अहिल्या विद्यापीठ, इंदूर, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद, विक्रम विद्यापीठ, उज्जैन, मारवाडी विद्यापीठ, राजकोट, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मुंबई विद्यापीठ मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर विद्यापीठातील एकूण ७४ विद्यापीठाच्या चमू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार, २५ ऑक्टोबरला रात्री ८ वाजता कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेत होईल. जिल्हाधिकारी सौरभ कटियार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. मनपाचे आयुक्त सचिन कलंत्रे, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव मेतकर, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, स्वीकृत सदस्य नरेशचंद्र पाटील, डॉ. पुरुषोत्तम वायाळ व प्राचार्य डॉ. अमोल महल्ले या समारंभाला प्रामुख्याने उपस्थित राहतील.

## विधानसभा निवडणुकीसंदर्भात चर्चेकरिता युवा स्वाभिमान पार्टीच्या कोर कमिटीची बैठक

### आमदार रवी राणांनी कार्यकर्त्यांना दिले बडनेरा मतदारसंघात कामाला लागण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती -** युवा स्वाभिमान पक्षाच्या कोर कमिटीचीमहत्वाची बैठक आ. रवि राणा यांच्या उपस्थितीत राजापेठ येथील दिपार्चन हॉल येथे संपन्न झाली. यावेळी युवा स्वाभिमान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष निळकंठराव कात्रे, उपाध्यक्ष जयंतराव वानखडे, कोषाध्यक्ष शैलेंद्र कस्तुरे, मार्गदर्शक सुनिल राणा, सदस्य हरिष चरपे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी विधानसभा निवडणुकीमध्ये अमरावती जिल्हयात आठही मतदारसंघात युवा स्वाभिमान पार्टीचे उमेदवार उभे करण्यावर तसेच इतर विधानसभेच्या निवडणुकीच्या मुद्यांवर कोर कमिटीव्दारे चर्चा करण्यात आली. यावेळी आ. रवि राणा यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना





सूचना देत सांगितले की, ज्याप्रमाणे २००९ पासून ते २०२४ पर्यंत आपल्या मेहनतीने व जनतेने दिलेल्या आशिर्वादाने मी निवडून आलो. त्याचप्रमाणे यावर्षीच्यानिवडणुकी मध्ये सुध्दा बडनेरा मतदारसंघातील प्रत्येक गावात प्रभागा प्रभागात बैठकी लावून आतापासून कामाला लागण्याच्या सूचना दिल्या. यावेळी उपस्थित महिला व पुरुष कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी आमचा भाऊ रवी भाऊ अशा जोरदार घोषणा देत आ. रवि राणा यांना चौथ्यांदा निवडून आणण्याचा संकल्प केला. यावेळी डॉ. आशिष मालु, सुखदेव तरडेजा, ज्योतीताई सैरीसे, सुमती ढोके, संजय हिंगासपुरे, अजयजयस्वाल, अजय मोरया, अर्चना तालन, चंदा लांडे, गणेशदास गायकवाड, शिवदास घुले, सचिन भेंडे, दिनेश टेकाम, गंगाधर आवारे, सत्येंद्रसिंग लोटे, कमल किशोर मलानी, विलास वाडेकर, बाळू इंगोले, निलेश भेंडे, अश्विनी झोड, नितीन बोरेकर, विनोद गुहे, मिलींद कहाळे, रोषनी लुचाईवाले, विनय घिमे, मनोहर गज्ज मारोडकर, अरुणा चचाने, लता अंबुलकर, रहीसा परविन, समिक्षा गोटेफोडे, पराग चिमोटे, सह अनेक पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# ही वेळ भूमिपूजन करण्याची नाही तर लोकार्पण करण्याची - डॉ.सुनील देशमुख

## खोडके दाम्पत्यांवर ही जोरदार बरसले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** आम्ही महायुतीच्या काळात वाढलेली महागाई, भ्रष्टाचाराचा पंचनामा करणार आहोत. आचारसंहिता लागण्यापूर्वी तीन ते चार दिवसांमध्येच २० हजार कोटींच्या कामांचे भूमिपूजन झाल्याचे सांगण्यात आले आहे. ही वेळ भूमिपूजन करण्याची नाही तर लोकार्पण करण्याची आहे. जिल्ह्यातील कंत्राटदारांचे ६५० कोटी थकीत असताना ते शासनाने दिले नाहीत. केवळ निवडणुका डोळ्यापुढे ठेवून मोठ्या घोषणा केल्या जात असल्याची टीका माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केली. प्रत्येक जिल्ह्यात सत्तारूढ आमदारांना निधी देण्यात आला, तर दुसरीकडे रोहयोसह संजय गांधी निराधार योजनेचे मानधन गरजूंना देण्यात आले नाही. शहरात दहा दिवसांत ५ खून झाले मात्र पालकमंत्री तथा शहरातील दोन्ही आमदार बोलायला सुद्धा तयार नसल्याचा कोरडा डॉ. देशमुख यांनी ओढला. या



सरकारने काढलेले ७० जीआर निवडणूक आयोगाने रद्द केले आहेत. केवळ ठगवा ठगवीच्या घोषणा केल्या आहेत. मनपाकडे फुटाणे खायला पैसा नाही, कर्मचाऱ्यांना द्यायला पैसे नाही ती महापालिका ८ कोटी कुठून आणणार. ९८० कोटी निधी आणल्याचा गवगवा केला जात आहे.

मात्र पाइपलाइनसाठी मनपाला ३५० कोटी उभे करावे लागणार आहेत. ते कुठून आणणार असा प्रश्न डॉ. देशमुख यांनी उपस्थित केला.

# विल हैरीस यांचे कार्य युवकांसाठी प्रेरणादायी -डॉ नितीन धांडे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती** प्रा राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट बडनेरा च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे दिनांक १८ ऑक्टोंबर रोजी महाविद्यालयामध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी विल हॅरिस व त्यांचे सहकारी उपस्थित होते.सदर कार्यक्रमामध्ये व्यक्तिमत्व विकास च्या विविध पैलू न वर प्रकाश टाकण्यात आला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांनी विल हैरीस यांचे स्वागत केले,व विल हर्रीस यांचे कार्य फार मोठे व प्रेरणादायी असल्याचे त्यांनी म्हटले व युवकांनी त्यांच्या कडुन प्रेरणा घ्यावी असे आवाहन देखील केले.विल हैरीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज स्वामी विवेकानंद , व संत तुकडोजी महाराज यांच्या विचारांची आजच्या जीवन पद्धतीसोबत सांगड घालून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महापुरुषांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास केल्यास आपल जीवन कसे सोयीस्कर होईल या कडे प्रामुख्याने लक्ष वेधले. कार्यक्रमादरम्यान तानिया डायमंड, कोरीना स्तोफेल व सर्गियो ग्याझीयानो यांनी सुद्धा भाषेचे महत्व, आत्मविश्वासाची गरज व कामाप्रतीचा हेतू या विविध विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. हरकुट होते ,प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. ए. व्ही. कडू , विलपावर फाउंडेशनचे कोफाउंडर शुभम नागपुरे, केसिया क्लीटोस, इलायाना फर्नांडीस, टीना कुपरस्मिथ, स्तेफिनी एडरसन, ऐस्टार येले, सर्जिओ गाझीयानो होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो चे कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभम कदम यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनाकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. हरकुट यांचे मार्गदर्शन लाभले तसेच महाविद्यालयाचे जनसंपर्क प्रमुख डॉ लोभस घडेकर, रासेयो चे कार्यक्रम अधिकारी प्रा शुभम कदम, देवेंद्र निकाळजे हर्शल ठाकूर ,अंश कटोले, गौरव खाडे, दीपराज नांदुरकर, प्रा. अमोल नेरकर, श्री अंकुर मोहोड, श्री विनोद चौधरी, धीरज बिजवार, प्रवीण मायंदे ,अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनामताई चौधरी, श्री पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा.गजानन काळे यांनी कौतुक केले .-

# श्री अलंकार ज्वेलर्स मधून युवकाने केल्या ७३ ग्रॅम चे ब्रेसलेट व अंगठ्या लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती -** अमरावतीस्थानिक शहर कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या मोर्शी मार्गावरील जयस्तंभ चौक येथील सहकार भवन येथील सराफा दुकानातून एका चोरट्याने भरदिवसा सुवर्णलंकार लंपास केले. आरोपीने सुमारे ७३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने लांबविले आहेत.

जयस्तंभ चौक परिसरात नितीन पारेख यांचे श्री अलंकार आर्ट नामक सराफा दुकान आहे. त्यांच्या दुकानात आज शुक्रवारी दुपारी श्रीमंत व्यक्ती प्रमाणे दिसणारा युवक आला होता. त्याने सोन्याची अंगठी व ब्रेसलेट विकत घ्यायचे असल्याचे सांगितले. यानंतर त्याने सोन्याची अंगठी व ब्रेस हातात घालून पाहिले. त्याने काही सोन्याच्या अंगठ्या




हातात घालून पाहिल्या होत्या. चोरट्याने हातात अंगठ्या, ब्रेस अशा प्रकारे ७३ ग्रॅम वजनाचे सुवर्णलंकार घातले. तोपैसे देण्यापूर्वी तेथील महिलेसोबत बोलत होता. त्याने काही वेळ चर्चा केली. यानंतर अचानक तो त्यांना चकवून त्यांच्यासमोरून पसार झाला. अचानक घडलेल्या घटनेमुळे दुकानात खळबळ उडाली. दुकानाचे संचालक व इतर कर्मचारी आरोपीचाशोध घेण्यासाठी बाहेर आले. परंतु तोपर्यत चोरटा पसार झाला होता.

# विधानसभेसाठी जिल्ह्यात १,०९,९७२ मतदार वाढले

## पुरुषांपेक्षा महिला मतदारांची संख्या जास्त, पुरुष मतदार ४२९५० तर महिला ६७०१४

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** अमरावती लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यात १५ ऑक्टोबरपर्यंत १ लाख ९ हजार ९७२ नवीन मतदार वाढले आहेत. यात ६७ हजार ०१४ महिला, ४२ हजार ९५० पुरुष तर ८ इतर मतदार आहेत. नव नोंदणी करणाऱ्यांमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत २४ हजार ६४ महिला मतदारांची संख्या जास्त आहे. जिल्हा निवडणूक विभागाने मतदार संख्या वाढीसाठी वेळोवेळी राबवलेल्या मतदार नोंदणी कार्यक्रमांद्वारे तसेच १८ वर्ष वय पूर्ण झालेल्या नव मतदारांनी नोंदणी केल्यामुळे १ लाखावर मतदार जिल्ह्यात वाढले आहेत. सर्वाधिक २५ हजार ९२६ मतदार अमरावती विधानसभा मतदारसंघात, तर त्यानंतर २३ हजार ४२ बडनेरा, १३ हजार ५० मेळघाट, ११ हजार २१ तिवसा, १० हजार २५७ अचलपूर, ९ हजार ४९७ धामणगाव रेल्वे, ९ हजार १३२ मोर्शी आणि ८ हजार ४७ मतदार हे दर्यापूर मतदारसंघात वाढले आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी जिल्ह्यात २४ लाख २५ हजार ४ मतदार होते. तर आता विधानसभा निवडणुकीच्या वेळी



जिल्ह्यातील आठही मतदारसंघात २५ लाख ३४ हजार ९७६ मतदार आहेत. मतदार नोंदणी ही १९ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असल्यामुळे १५ ऑक्टोबरपर्यंत जेवढ्या मतदारांनी नोंदणी केली त्यात आणखी भर पडण्याची शक्यता आहे. कारण, मतदार नोंदणीसाठी १९ ऑक्टोबरपर्यंत मुदत असल्याचे कळाल्यानंतर अनेक मतदारांनी ऑनलाइन नावनोंदणी करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचप्रमाणे ज्या मतदारांनी नोंदणी केली परंतु, त्यांचे नावच मतदार यादीत आले नाही, अशाही मतदारांनी पुन्हा नोंदणी करण्याचा सपाटा लावला आहे. २५.३४ लाखांवर मतदार जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघात एकूण २५ लाख ३४ हजार ९७६ मतदार आहेत. यात १२ लाख ८९ हजार १९६ पुरुष, तर १२ लाख ४५ हजार ६८४ महिला मतदार आहेत. इतर मतदारांची संख्या ही ९६ आहे. सर्वाधिक ३ लाख ७२ हजार ३४२ मतदार हे अमरावती तर त्यानंतर ३ लाख ६१ हजार १२१ मतदार हे बडनेरा मतदारसंघात आहेत. सर्वात कमी २ लाख ९० हजार २७४ मतदार हे मोर्शी मतदारसंघात आहेत. सर्वाधिक ४४ इतर मतदार बडनेरा तर २७ अमरावती मतदारसंघात आहेत. जिल्ह्यात १०० वर्षांवरील १ हजार ३३२ ज्येष्ठ नागरिक अर्थात आजोबा, पणजोबा मतदार असून, यापैकी सर्वाधिक ३४५ मतदार हे अमरावती मतदारसंघात आहेत. यात ६६२ पुरुष, तर ६७० महिला मतदार आहेत. या ज्येष्ठ मतदारांचे वय हे १०० ते ११० वर्षांपर्यंत असल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाद्वारे देण्यात आली आहे. १२० वर्षांच्या दोन ज्येष्ठ मतदारांची चुकून नोंद झाली असून ती वगळली आहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या काळातही हे दोन मतदार असल्याची नोंद होती. यापैकी एक अमरावती तर दुसरे बडनेरा मतदार संघात होते. ज्येष्ठ नागरिक हे सध्या आजोबा, पणजोबा असून त्यांनी अनेक निवडणुकांमध्ये मतदान केले आहे.

# सचिन कलंत्री मनपा आयुक्त यांनी शहरी आरोग्य केंद्राला भेट देऊन आरोग्य विभागाची केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती**

शहरातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या तारखेडा शहरी आरोग्य केंद्र तसेच पठाण चौक येथील शहरी आरोग्य केंद्राला सचिन कलंत्री आयुक्त महानगर पालिका व आरोग्य अधिकारी डॉ .विशाल काळे यांनी अचानक भेट दिली तेथील सर्व आरोग्य साठी लागणाऱ्या औषधी, रुग्णावर होणाऱ्या तपासण्या , दवाखान्याची उघडण्याची वेळ, रोज दैनंदिनी होणारे रुग्णाची संख्या त्यांमध्ये बालकाची संख्या , महिलांची संख्या व पुरुष. वयस्कर यांची संख्या किती हे जाणून घेतले तसेच बालकांवर होणाऱ्या लासिकरणाबाबत आढावा घेतला उपस्थित असलेले वैद्यकीय अधिकारी यांना वेळोवेळी येणाऱ्या अडी अडचणी व कर्मचारी यांना विचारपूस केली तसेच आरोग्य कर्मचाऱ्याना कडक निर्देश दिलेत आपल्या परिसरातील माता व बालक याच्यावर माता व बाल आरोग्य कार्यक्रम अंतर्गत त्यांची वेळोवेळी तपासण्या झाल्या पाहिजेत तसेच शहरात साथ रोग पसरू नये ह्या साठी कडक सर्वे करून तापाचे रुग्ण दिसल्यास त्यांना रक्ताची तपासणी करून तत्काळ निदान करावे असे निर्देश



आरोग्य सेवक , आशा वर्कर यांना केले तसेच पठाण चौक येथे गप्पी मासे उत्पादन केंद्राला भेट देऊन गप्पी मासे ची पाहणी केली व सदर गप्पी मासे स्वच्छ साठलेले पाणी असेल तिथे आरोग्य सेवक च्या माध्यमातून टाकावे असे आदेश देण्यात आले सर्व डॉक्टरांचे , आरोग्य सेवक यांचे व आशा वर्कर , तसेच तेथील रजिस्टर, हजेरी बायोमेट्रिक दैनिक कामाची रजिस्टर नोंद वही तपासले सर्व आरोग्य यंत्रणा सज्ज व सुसज्य व साथ रोग निर्मूलन साठी प्रतिबंधात्मक उपाय योजना साठी तयार आहे असे पाहून सचिन कलंत्री आयुक्त यांनी आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे व साथ रोग अधिकारी डॉ रुपेश खडसे तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौतुक केले ह्या आरोग्य केंद्रात डॉ निगार खान स्त्री वैद्यकीय अधिकारी , साथ रोग अधिकारी डॉ रुपेश खडसे , आरोग्य सेवक बरडे व इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यामध्ये ९ महिन्यात १९३ शेतकऱ्यांनी संपवली जीवनयात्रा

## ७० आत्महत्या चौकशीसाठी प्रलंबित तर ७७ पात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती-** अमरावती जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरूच असून मागील काही वर्षात शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवण्याच्या घटनेत वाढ झाली आहे. सततची नापिकी, कर्ज, पावसाचा खंड, अतिवृष्टी यामुळे पिकांचे उत्पादन कमी होण्याची भीती तसेच शासनाचे उदासीन धोरण या कारणांचे परिणाम आता जाणवू लागले आहेत. यंदा जिल्ह्यात १ जानेवारी ते ३० सप्टेंबरपर्यंत १९३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यामध्ये शेतकरी आत्महत्यांच्या निकषानुसार ७७



पात्र ठरल्या आहेत. तर ४६ आत्महत्या अपात्र ठरल्या आहेत. याशिवाय ७० प्रकरणे चौकशीकरिता प्रलंबित आहेत. अमरावती जिल्ह्यात नऊ महिन्यात तब्बल १९३ शेतकऱ्यांनी गळफास लावून आत्महत्या केल्याचे समोर आले. यामध्ये एकूण प्रकरणांपैकी ७७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या पात्र ठरवण्यात आल्या. तसेच

### आत्महत्येची ही आहेत कारणे...

शेतमालाला जाहीर केलेला हमीभाव कधीच मिळत नाही. परिणामी, पिकावर केलेला खर्चही निघत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होत आहे. त्यामुळे मुलींचे शिक्षण, आरोग्य खर्च, लग्न, उदरनिर्वाह, सावकार, बँकेचे कर्ज कसे फेडणार, या विवंचनेतून शेतकरी आत्महत्या होत आहेत.

निकषानुसार ४६ आत्महत्या अपात्र तर ७० चौकशीकरिता प्रलंबित ठेवल्या आहेत. निकषानुसार पात्र शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना मदत देण्यात येते.

पहिला ३० हजारांचा हप्ता हा आठ दिवसांमध्ये देण्यात येतो. उर्वरित ७० हजार रुपये त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येतात. यातील किती पात्र शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत देण्यात आल्याची माहिती मात्र प्रशासनाकडून देण्यात आली नाही. मार्च महिन्यात सर्वाधिक ३३ आत्महत्या जिल्ह्यात मार्च महिन्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत.

रब्बी पिकांचे नुकसान, कर्ज, कुटुंबाचा गाडा कसा हाकणार, या विवंचनेतून याच महिन्यात सर्वाधिक ३३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. यापैकी १ प्रकरण प्रलंबित तर १३ अपात्र ठरवले आहे. यातील २९ आत्महत्या पात्र ठरल्या आहेत. महिना प्रकरणे पात्र अपात्र प्रलंबित जाने. २१ ११ ८ २ फेब्रु. २६ १५ ७ ४ मार्च ३३ १९ १३ १ एप्रिल २२ १४ ४ ४ मे १९ ६ ७ ६ जून १५ ५ ४ ६ जुलै १५ ७ १ ७ ऑगस्ट १७ ० २ १५ सप्टें. २५ ० ० २५ एकूण १९३ ७७ ४६ ७०

# श्रीगुरुदेव अध्यात्म गुरुकुल येथे आजपासून पालखी पदयात्रा शिबिर महोत्सव

## अड्याळ टेकडी व इतर पालख्यांचे आगमन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ गुरुकुंज मोझरी** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील श्रीगुरुदेव अध्यात्म गुरुकुल येथे ग्रामगीता तत्त्वज्ञान महायज्ञ व पालखी पदयात्रा शिबिर महोत्सव चे आयोजन करण्यात आलेले आहे. या उत्सवाला आजपासून सुरुवात होत आहे.

श्रीगुरुदेव आत्मानुसंधान टेकडी अड्याळ येथील मुख्य पालखीसह आडकुजी महाराज संस्थान वरखेड व गावा-गावातील पालख्यांचे आज आगमन होणार आहे. सर्व पालकांचे मोठ्या उत्साहात स्वागत होईल व सामुदायिक प्रार्थना करून या तीन दिवसीय शिबिराची सुरुवात होईल. सामुदायिक प्रार्थनेच्या महत्त्वावर ह.भ.प श्री नामदेव महाराज गव्हाळे यांचे चिंतन होणार आहे.कर्मयोगी संत तुकाराम दादा गीताचार्य यांच्या संकल्पनेतून चालत असलेले या शिबिरामध्ये पालखी पदयात्रे करुंना शिरजगाव मोझरी येथून शिदोरी महाप्रसादाचे भोजन दिल्या जाते शिरसगाव या गावातून गेल्या पन्नास वर्षापासून शिदोरी महाप्रसादाची ही सेवा अखंडितपणे सुरू आहे.गुरुकुल येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे बाल कीर्तनकारांचे कीर्तन हा आजचा आकर्षण बिंदु असणार आहे. यामध्ये बाल कीर्तनकार आर्यन निस्ताने , अथर्व देशमुख, विवेक गहाणे इत्यादी विद्यार्थ्यांचे कीर्तन सादरीकरण होणार आहे.

समारोपीय सत्रामध्ये श्रीकृष्ण महाराज झगेकर, श्री नामदेव महाराज माकोडे, डॉ. सुरेश महाराज उदार, श्रीकृष्ण महाराज आखरे इत्यादी ज्येष्ठ प्रचारकांची राष्ट्रीय खंजरी कीर्तनातून प्रबोधनाचे कार्यक्रम आज संपन्न होणार आहेत. श्री प्रभाकर



हिवराळे व संच त्यांना संगीताची साथ देणार आहे.

या तीन दिवसाच्या शिबिराचे मुख्य मार्गदर्शक मा योगेंद्र जी यादव सामाजिक कार्यकर्ता नवी दिल्ली, यांचे दिनांक २१ ला संध्याकाळी सात वाजता विशेष व्याख्यान होणार असल्याची माहिती श्रीगुरुदेव अध्यात्म गुरुकुल चे संचालक रवी मानव यांनी दिली.भव्य रोगनिदान शिबिर, रक्तदान शिबिर, मरणोत्तर देहदान व अवयव दान संकल्प इत्यादी समाज उपयोगी उपक्रमांचे आयोजन देखील या निमित्ताने करण्यात आलेले आहे. राष्ट्रसंत युवक विचार मंचाचे कार्यकर्ते ही जबाबदारी पार पाडत असल्याची माहिती युवक युती विचार मंचाचे अध्यक्ष अमर वानखडे यांनी दिली.

# फ्लॅश मॉबच्या माध्यमातून रेड रिबन क्लब करतात एच.आय.व्ही. एड्स बाबत जनजागृती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, खउढउ जिल्हा सामान्य रुग्णालय,अमरावती अंतर्गत रेड रिबन क्लब च्या माध्यमातुन अमरावती जिल्ह्यामधुन श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक यांनी फ्लॅश मॉब चा माध्यमातून आजचा तरुण पिढीला माहिती देण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन गाडगेबाबा समाधी मंदिर समोर बसस्थानक परिसरात व अमरावती मध्यवर्ती बस स्थानक मध्ये एड्स जनजागृती फ्लैशमॉब, पथनाट्याचे सादरीकरण केले....

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी द्वारे प्रत्येक जिल्हा जन्नत मीडिया द्वारे आणि रेड रिबन क्लब द्वारे या फ्लैशमॉब आयोजन करण्यात येते त्या करिता अमरावती जिल्हा मधून श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांची निवळ करण्यात आली व त्यांचा माध्यमातून आणि श्री. डॉ ए एल कुलट सर प्राचार्य, प्रभारी प्राचार्य वर्षा मॅम,प्रा जोशी सर एन एस एस कार्यक्रम अधिकारी,प्रा. डॉ अपर्णा सरोदे महिला एन एस एस कार्यक्रम अधिकारी,प्रा. रुपेश फसाटे यांचा मार्गदर्शनात महविद्यालयाचा रेड रिबन क्लब व एन एस एस चा विद्यार्थ्यांनी या फ्लेशमॉब चे सादरीकरण केलं.या कार्यक्रमाचा माध्यमातून सर्व लोकांन पर्यंत एच आय व्ही एड्सबाबत जनजागृती व्हावी,आजार बाबत लोकांन मधील भीती काढणे आणि एच आय व्ही एड्स सारखा आजाराविषयी लोकांनी चर्चा करावी हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.या कार्यक्रमात जिल्हा सामान्य रुग्णालय चे श्री. साखरे सर जिल्हा कार्यक्रम अधिकारी, श्री. प्रकाश शेगोकर जिल्हा समन्वयक,श्री. श्याम वाहाने खउढउ समुपदेशक, श्री.लोकेश पवार या सर्व कर्मचारी सहकार्यातून कार्यक्रम पार पडला.

# आचारसंहितेत लटकली जिल्हा बँकेची पदभरती

## १६२ पदांसाठी सुरु झाली होती प्रक्रिया



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचीपदभर्ती प्रक्रिया विधानसभानिवडणुकीसाठी लागलेल्याआचारसंहितेमुळे अर्ध्यातचलटकली आहे. लिपिक आणि चतुर्थ श्रेणी संवर्गाच्या १६२ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरु करून ती पुढे नेली जात असतानाच आचारसंहिता लागू झाली आणि ही प्रक्रिया जिल्हा बँकेला स्थगित करावी लागली आहे. आचारसंहिता संपताच भरती प्रक्रिया ज्या स्थितीत आहे, त्याच स्थितीत पुढे सुरु करण्याची अपेक्षा उमेदवार बाळगून आहेत.प्राप्त माहितीनुसार जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाने लिपिक व शिपाई पदाच्या १६२जागांसाठी भरती प्रक्रियेला मंजूरीदिली होती.

अनेक वर्षांपासूनजिल्हा बँकेत अनेक वर्षांपासूनलिपिक आणि शिपाई पदाचीभरती झालेली नाही. याप्रक्रियेमुळे अनेक बेरोजगारयुवकांच्या नोकरी मिळण्याच्याआशा पल्लवित झाल्या होत्या. पण आचारसंहितेने त्यांच्या आशेवर विरजन घातले आहे.आचारसंहिता संपताच पून्हा १६२ पदांसाठीची ही भरती प्रक्रिया पुढे सुरु करण्यात येईल, असे जिल्हा बँक प्रशासनाने सांगितले आहे.

# शाळेत पोरांचा 'अपार आयडी' निघणार

## शैक्षणिक सर्व माहिती मिळणार एका क्लिकवर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने आधार कार्डप्रमाणेच विद्यार्थ्यांची स्वतंत्र शैक्षणिक माहिती डिजिटल स्वरूपात साठविण्याच्या उद्देशाने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने प्रत्येक विद्यार्थ्यांचा 'अपार' (ऑटोमेटेड पर्मनंट अॅकॅडमिक रजिस्ट्री) नंबर तयार करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध व्हावी, तसेच पाहिजे तेव्हा ती ऑनलाइन स्वरूपात बघता यावी, यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने मोठा निर्णय घेतला आहे. यासाठी 'वन नेशन वन स्टुडंट' आयडीच्या धर्तीवर आता प्रत्येक विद्यार्थ्यांचा इयत्ता नववीपासून अपार नंबर तयार करण्यात येणार आहे. यामुळे नववी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक माहिती उपलब्ध होणार आहे. हा नंबर डिजीलॉकरलाही जोडण्यात येणार आहे. पुढील एक महिन्यात यावर अंमलबजावणी करण्यात यावी, अशा सूचना राज्य प्रकल्प संचालकांकडून जिल्हा परिषदेला दिल्या आहेत. 'अपार' मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक रेकॉर्ड एका शाळेतून दुसऱ्या शाळेत किंवा जिल्हा आणि राज्यामध्येऑनलाइन पाठवणे सुलभ होईल. विद्यार्थ्यांचे 'अपार' आयडी विद्या समीक्षा केंद्रांना जोडण्यात येऊन त्या माहितीचे ग्राफिकल ॲनालिसिस करण्यात येईल. 'यू' डायस प्लस प्रणालीच्या ज्या विद्यार्थ्यांचे आधार वैध असेल, त्यांचेच अपार आयडी तयार होतील. अपारमुळे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा, प्रगती अहवाल, शाळाबाह्य मुलांचा शोध, गळतीचे प्रमाण घटविण्यास मदत करणे आदी बाबी नियंत्रित करण्यात येणार आहेत.

### एका क्लिकवर माहिती होणार उपलब्ध

'अपार' मुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचे मॉनिटरिंग सोपे होणार आहे. 'अपार' आयडी तयार झाल्यानंतर तो डिजीलॉकरला जोडण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षण क्षेत्रात साधलेले लक्ष्य दहावी आणि बारावी परीक्षेचे निकाल, उपक्रम आणि स्पर्धा परीक्षांमधील यश आदी माहिती ऑनलाइन पाहता येणार आहे.

# अभाविप अमरावती विभागाच्या 'सामाजिक एकता यात्रे'चे उद्घाटन संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) अमरावती विभागाच्या वतीने आयोजित सामाजिक एकता यात्रेला आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाधी स्थळावरून सुरूवात झाली. या यात्रेचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोजरी येथे पार पडले.

उद्घाटन सोहळ्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधी संस्थेचे पदाधिकारी श्री. राजुजी बोथे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री आनंद वाळके तसेच आर्या पाचखेडे, संदेश उरकुडे, अनिकेत पजई, रिद्धेश देशमुख, ओम धाके, ऋषभ गोहणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते, विद्यार्थी व लोक उपस्थित होते. या यात्रेचे उद्दिष्ट सामाजिक एकतेचा संदेश समाज व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे असून, मोझरीपासून सुरू झालेली ही यात्रा अमरावतीतील गाडगे महाराजांच्या समाधीवर समाप्त होणार आहे. यामध्ये जवळपास १५,००० ते २०,००० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा उद्देश आहे. यात्रेदरम्यान विविध शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये एकात्मता व राष्ट्रभावनेचा संदेश पसरवला जाणार आहे.

# ११ ऑक्टोबर ते ३० जानेवारीपर्यंत जिल्ह्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

जिल्ह्यात श्रीसंत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचा श्रीगणेशा झाला आहे. यानुसार जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने ११ ऑक्टोबर ते ३० जानेवारी २०२५ पर्यंतचा स्वच्छता अभियानाचा कार्यक्रम निश्चित करून दिलेला आहे. त्याची अंमलबजावणी जिल्हाभरातील ८४१ ग्रामपंचायती स्तरावर सुरू करण्यात आलेली आहे.ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मूळ उद्देश ग्रामीण जनतेच्या आरोग्यमानाचा दर्जा उंचावणे हा आहे. स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्यमान, जीवनस्तर उंचावण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या अभियान, कार्यक्रमामध्ये निर्माण होणाऱ्यास्वच्छतेसंबंधी मत्ता, गावामध्ये तयार होणाऱ्या नव्या सुविधा नागरिकांचे स्वच्छतेबाबतीत होणारे मत परिवर्तन व गावागावांतून स्वच्छता चळवळीत सर्व नागरिक, ग्रामस्थाचा सक्रिय व सातत्यपूर्ण सहभाग घेऊन गावामध्ये स्वच्छतेची व्याप्ती वाढवून संत गाडगेबाबात ग्राम स्वच्छता अभियान राबवून जास्तीत जास्त कुटुंबापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्याकरिता ग्रामपंचायत, तालुका व जिल्ह्यात स्वच्छतेच्या विविध पैलूंतील आणि सर्व समावेशक स्पर्धा राबवून ग्रामस्थांना प्रोत्साहित करून या कार्यक्रमाचा आपलेपणा व महत्त्व पटवून देण्यासाठी सन २०००-२००१ पासून सदर अभियान राबविण्यात येत आहे.

त्यानुसार जिल्हाभरातील ८४१ ग्रामपंचायतींमध्ये श्रीसंत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान ११ ऑक्टोबर ते ३० जानेवारी २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या मार्गदर्शनात पाणी पुरलठा व स्वच्छता विभागाचे डेप्युटी सीईओ संजय खारकर यांनी १४ पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना स्वच्छता अभियानाच्या वेळापत्रकानुसार अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत.




### असे आहे अभियानाचे वेळापत्रक

ग्राम स्वच्छता अभियानाची १९ ते ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत ग्रामस्तरावर समिती गठण व कृती कार्यक्रम निश्चिती, जिल्हा परिषद गट स्तर स्पर्धा व तपासणी २१ नोव्हेंबर ते २१ डिसेंबर, जिल्हा परिषद गट स्तरावर प्राथमिक तपासणी २१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर, जिल्हा परिषद स्तरावर अंतिम तपासणी ६ ते २१ डिसेंबर, जिल्हास्तरीय तपासणी २२ डिसेंबर ते ६ जानेवारी २०२५, विभागीय तपासणी ७ ते ३० जानेवारीपर्यंत केली जाणार आहे.

# अचलपुरात ४५ जणांचे पाऊण किलोमीटर लोटांगण

## 'गोविंदा गोविंदा'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

शहरातील जीवनपुरा येथील बालाजी देवस्थानात शेकडो वर्षांपासून लोटांगण घालण्याची परंपरा आजही कायम आहे. शुक्रवारी पहाटे ५ पासून ४५ भक्तांनी पाऊण किलोमीटर लोटांगण घातले. यात एकाने दोन वेळा लोटांगण घातले. 'गोविंदा गोविंदा'च्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमला होता.

इसवी सन १११० पासून अचलपूर शहरातील जीवनपुरा भागात बालाजी देवस्थान येथे मनोकामना पूर्ण होण्यासाठी श्रद्धेपोटी लोटांगण केले जाते. शुक्रवारी पहाटे ४ पासूनच परिसरातील सर्व नागरिकांनी घरापुढील अंगण स्वच्छ पाण्याने धुवून त्यावर रांगोळ्या काढल्या. पहाटेच स्नान करून बालाजी मंदिरात पूजाअर्चेसाठी ते हजर झाले. आरती होताच ४५ जणांनी लोटांगण घातले. यात ज्येष्ठ नागरिकांपासून, तर युवकांचा समावेश राहिला.यावेळी लोटांगण मार्गाची सफाई नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आली होती.तर लोटांगणाच्या वेळी पोलिसांनी मुख्य मार्गावरील वाहतूक इतर मार्गांनी वळविली होती.

**राम अवतार, त्राटिका वध, प्रदक्षिणा**

लोटांगणाच्या एक दिवसापूर्वी भक्तीमय कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यामध्ये पाच दिवस हत्ती, घोडा, सिंह, गरुड, हनुमान अशा पाच प्रकारच्या वाहनातून प्रदक्षिणा घालण्यात आली. त्यानंतर राम अवतार व त्राटिका वध कार्यक्रम पार पडला.

# साश्रू नयनांनी निरोप, श्रीक्षेत्र कन्होली येथे हजारोंच्या उपस्थितीत समाधी



## संत अंबादास महाराज अनंतात विलीन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

संत अंबादास महाराज (८३) यांचेगुरुवारी देहावसान झाले. दर्यापूर तालुक्यातील कान्होली येथील श्री अंबादास महाराज आश्रमचे ते संस्थापक अध्यक्ष तथा सर्वेसर्वा होते. महाराजांच्या निधनाची वार्ता कळताच हजारो भाविक गुरुवारी रात्रीच कन्होली येथील संस्थांमध्ये दाखल झाले होते. या हजारो भाविकांच्या उपस्थितीत ध्यान मंदिराच्या समोरील जागेत दुपारी २ च्या सुमारास विधिवत पूजन करून संत अंबादास महाराज यांना समाधी देण्यात आली.

संत अंबादास महाराज लाखो भाविकांच्या श्रद्धास्थानी असल्याने त्यांचा भक्तगण गुजरातलासुद्धा मोठा आहे. त्यांची अंत्ययात्रा दुपारी १ वाजता निघाली. पंचक्रोशीतून आलेल्या भाविकांच्या दिंड्यांनी वाजतगाजत पार्थिवाची मिरवणूक काढण्यात आली. सयाजी महाराज, रोहित महाराज, अच्युत महाराजांचे शिष्य सचिन देव महाराज, मोझरी येथील जनार्दन बोथे यांनी महाराजांचे अंत्यदर्शन घेतले. संस्थान परिसरात असलेल्या ध्यान मंदिरात १०९ कुंडी यज्ञस्थळी महाराजांचा देह नेण्यात आला होता. साश्र नयनांनी हजारो भाविकांनी त्यांनाअखेरचा निरोप दिला.

दर्यापूर तालुक्यात कान्होली येथे संत न अंबादास महाराजांचा जन्म ६ जून १९४२ रोजी परीट कुटुंबात झाला. तथापि, वडील शिवरामजी व आई पार्वताबाई उंबरकर हे शेती न व्यवसाय करीत होते.लहानपणापासून भक्तीचा ध्यास असलेल्या संत अंबादास महाराजांना १९७१ मध्ये टाकरखेडा येथील संत लहानुजी बाबांशी संपर्क झाला व शिवीरूपात प्रसाद मिळाला.

त्यांच्यासह परमहंस श्री समर्थ सत्यदेव बाबा यांच्या प्रेरणेने कान्होली आश्रमामध्ये सन १९८० पासून श्री रामनवमी महोत्सव सुरू करण्यात आला. येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची सामुदायिक प्रार्थना, पूजाअर्चा, आरती, अभिषेक व दैनंदिन कार्यक्रम नियमित होतात. आश्रमात शेती, गौरक्षण, नियमित अन्नदान व आध्यात्मिक कार्यक्रम वेळोवेळी राबविण्यात येतात.

# आ. बच्चू कडू यांची सर्जिकल स्ट्राईक युवा स्वाभिमान पक्षाचे जितू दुधाने यांचा प्रहारमध्ये प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक दि. १९ अचलपुर**

काही दिवसांपूर्वी प्रहार पक्षाचे आमदार राजकुमार पटेल हे शिवसेना शिंदे गटात गेल्याने मोठी खळबळ निर्माण झाली होती मात्र बच्चू कडू यांनी थेट बडनेरा मतदार संघाचे आ. रवी राणा यांच्या घरात सर्जिकल स्ट्राईक करून आ. रवी राणा यांच्या विजयाचे शिल्पकार असलेले तसेच राणा दाम्पत्याचे राजकीय नियोजन करणारे युवा स्वाभिमानचे कोअर कमिटीचे पदाधिकारी जितू दुधाने यांना शुक्रवारी प्रहार पक्षात प्रवेश दिला. जितू दुधाने यांचा प्रहार पक्ष प्रवेश झाल्याने रवी राणा यांचे राजकीय गणित विस्कटले असल्याचा दावा राजकीय विश्लेषकांनी केला आहे. जितू दुधाने १७ वर्षांपासून युवा स्वाभिमान पक्षात कार्यरत असून रवी राणा यांच्या राजकीय प्रवासात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.दोन दिवसांपूर्वी त्यांनी आपला कोअर कमिटी पदाच्या सदस्यत्वाचा राजीनामा आ. रवी राणा यांच्याकडे सुपूर्द केला.युवा स्वाभिमान पक्षात निष्ठावंत कार्यकर्त्यांची होत असलेली कोंडी तसेच नव्या कार्यकर्त्यांना मान आणि अनेक वर्षांपासून युवा स्वाभिमान पक्षात कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांना अपमानास्पद वागणूक याशिवाय रवी राणा यांचे बंधू सुनील राणा यांचा कार्यकर्त्यांवर वाढत असलेला दबाव याला कंटाळून जितू दुधाने यांनी आपला राजीनामा सुपूर्द केला होता. शुक्रवारी अचलपूर येथे प्रहार पक्षाच्या वतीने आयोजित महाराष्ट्राची हस्यजत्रा या कार्यक्रमात थेट आ. बच्चू कडू यांच्या उपस्थितीत जितू दुधाने यांनी प्रहार पक्षात प्रवेश करून राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली. विशेष म्हणजे रवी राणा आणि बच्चू कडू यांचे राजकीय वैर सर्वश्रुत असतांना राणा यांच्या पक्षाच्या कोअर कमिटीतील पदाधिकाऱ्याने थेट प्रहार पक्षात प्रवेश घेणे म्हणजे रवी राणा यांच्यासारख्या दिग्गज नेत्याला एकप्रकारे आव्हान देण्यासारखे आहे.आ. बच्चू कडू यांनी जितू दुधाने यांना सन्मानाने प्रहार पक्षात प्रवेश देऊन त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. जितू दुधाने हे यांना राजकारणातील मॅनेजमेंट गुरू संबोधले जाते. या मॅनेजमेंट गुरूमुळे आ. बच्चू कडू यांना भविष्यातील राजकारणात चांगलाच फायदा होईल मात्र रवी राणा यांची नौका तरणार की बुडणार याकडे जिल्ह्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

**काँग्रेसचेही पानिपत**

अचलपूर तालुक्यात काँग्रेस पक्षाचेही पानिपत सुरू असून काँग्रेस पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसला रामराम ठोकला आहे.युवक काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष तथा अनुसूचित जाती सेल चे तालुका अध्यक्ष , सुरळी गावाचे कर्तव्यदक्ष उपसरपंच शैलेश निरगुडे यांनी सुद्धा शुक्रवारी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन आ. बच्चू कडू यांच्या उपस्थितीत प्रहार पक्षात प्रवेश केला.शैलेश निरगुड्यांच्या पक्षप्रवेशामुळे तालुक्यात प्रहारची आणखी ताकद वाढली आहे.

# आचारसंहितेचे उल्लंघन;करा सीव्हिजिल ॲपवर तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल सिटीझन ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जाणार आहे.

आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करू नये, याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काही वेळेला या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता




पूर्वीपेक्षा अधिकसुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल ॲप विकसित केले आहे.

या मोबाइल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सीव्हिजिल ॲपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशील, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडीओ अपलोड करणे आवश्यक आहे. कोणतीही भिती न बाळगता नागरिकांना तक्रार करता येते.

**अचूक कृती व देखरेख**

या ॲप्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सीव्हिजिल ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.

# प्रचारासाठी जागेची परवानगी आवश्यक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिगत जागा, इमारत, आवार, भिंत आदी ठिकाणांच्या संबंधित जागामालकाच्या परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय प्रचारासाठी वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. हे आदेश २५ नोव्हेंबरपर्यंत संपूर्णजिल्ह्यात अमलात राहणार आहेत. सुरक्षेसाठी मोटारगाड्या, वाहनांच्या ताफ्यात दहापेक्षा अधिक वाहने नसावीत. ताफ्यात दहापेक्षा जास्त मोटारगाड्या अथवा वाहने वापरण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.

# मतदानासाठी यादीतून शोधली जाताहेत परराज्यातील बहिणींची नावे



**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**

सासरी नांदायला गेलेल्या बहिणींना विधानसभा निवडणुकीत मतदान करता यावे यासाठी मतदार यादीत त्यांची नावे शोधली जात आहेत. नांदायला गेलेल्या ताईचे नाव गावच्या मतदार यादीत असल्याने कार्यकर्त्यांकडून अशा ताईच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याची धावपळ सुरू झाली आहे.

या ताईंना ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मोठे महत्त्व दिले गेले होते. आता विधानसभा निवडणुकीतही या बहिणींचे महत्त्व वाढले आहे.अचलपूर तालुक्यात सर्वचराजकीय पक्षाचे कार्यकर्ते सक्रिय झाले आहेत. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता घोषित होताच कार्यकर्ते कोमातून जोमात आले आहेत. पक्षाच्या उमेदवाराबद्दलची निष्ठा आणि आघाडीधर्म पाळला जाईल असा सूर कार्यकर्त्यांचा आहे. निवडणुकीतउमेदवाराला विजयी करण्याची जबाबदारी स्थानिक कार्यकत्यांवर राहत असल्याने हे कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. कार्यकर्त्यांकडे सध्या वेळ असल्याने गावांतील मतदार याद्यांची चाचपणी केली जात आहे.

बहुतांश बहिणी अन्य गावात सासरी नांदायला गेलेल्या आहेत. परंतु त्यांचे नाव गावातील मूळ मतदार यादीत आहे. विधानसभा निवडणुकीत या बहिणींच्यामतांवर डोळा राहणार आहे. त्याच अनुषंगाने ताई व जावईबापू यांचे मोबाईल क्रमांक शोधले जात आहेत. तशाही दिवाळीच्या सणासुदीला बहिणी माहेरी येणार आहेत. दिवाळी असल्याने ताई माहेरीच मुक्कामी राहणार आहे. हीच संधी हेरण्याची तयारी सुरू झाली आहे. जावईबापूचाही पाहुणचार हे कार्यकर्ते करणार असल्याचेही बोलले जात आहे.

जिल्ह्यातील विधानसभा क्षेत्रांमध्ये भावी आमदारांची गर्दी अधिक दिसत आहेत. विशेष म्हणजे, गाठीभेटी घेताना जातीय समीकरणाकडे ही लक्ष दिले जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने इच्छुकांची होत असलेली ही भाऊगर्दी मतदारांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे. दुसरीकडे उमेदवारी कोणाला मिळते? त्यानंतर सतेच्या सारीपाठासाठी चढाओढ रंगणार आहे.

## इच्छुक उमेदवारांच्या भेटीगाठी वाढल्या

आचारसंहितेची घोषणा होताच हवसे-नवसे हळूहळू का



असेना आपल्या प्रचाराची गती वाढवित आहेत. निवडणुकीच्या तोंडावर गाठीभेटी वाढल्या आहेत. मागील पाच वर्षांत अधूनमधून भेट दिलेल्या ही मतदारसंघात येत आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावरच हे चेहरे सामान्यांना दिसू लागले आहेत. काही लोक तर त्यांना भाऊ आतापर्यंत आमच्या गावात का आले नाहीत, असा प्रश्न विचारत आहेत.

# आता प्रतिज्ञापत्रासाठी लागणार १०० ऐवजी पाचशेचा स्टॅप

## लाडकी बहीण योजनेचा फटका सर्वसामान्य नागरिकांना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**

१०० व २०० रुपयांच्या मुद्रांकांची विक्री सुरू असले तरी व्यवहार मात्र ५०० रुपयांच्या मुद्रांकावरच करावे लागणार आहे. शासनाने १४ ऑक्टोबरला महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा केली व या अध्यादेशाची अंमलबजावणी सुरू झाल्याने वाढीव मुद्रांक शुल्काचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसल्याचा आरोप होत आहे.



जाता-जाता राज्य शासनाने योजनांचा वर्षाव केला, त्यामुळे गंगाजळी आटल्याने त्यात काही प्रमाणात भर घालण्याचा हा प्रकार ठरला आहे. शासनाने १ ऑक्टोबरच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेतला होता व १४ ऑक्टोबरला त्याचा अध्यादेशदेखील जारी झाला व झपाट्याने अंमलबजावणी सुरू केलेली आहे. त्यामुळे व्यवहारातील सर्व कागदपत्रे आता १०० व २०० रुपयांच्याऐवजी ५०० रुपयांच्या मुद्रांकावर करावे लागत आहेत. या सुधारणेमुळे शासन महसुलात अधिक्तम ५०० ते ७०० कोटीपर्यंतच वाढ होण्याची शक्यता प्रशासकीय वर्तुळात चर्चिली जात आहे.

### या कामासाठी आता ५०० रुपयांचा स्टॅम्प हवा

सुधारणेनुसार बँकांसह इतर कामकाजासाठी लागणारे प्रतिज्ञापत्र, हक्क नोंदणीचे प्रतिज्ञापत्र, साठेखतनंतरचे खरेदीखत, सामंजस्य करार प्रतिज्ञापत्र, वाटणीपत्र, विविध हमीपत्र, वाहन खरेदी-विक्र करार, जमीन व्यवहार यासह १०० रुपयांच्या मुद्रांकावर करण्यात येणारे प्रतिज्ञापत्र आता ५०० रुपयांच्या मुद्रांकावर करावे लागणार आहे.

# स्वस्त मिळतंय ? वेळीच सावध व्हा;दिवाळीत दिवाळं निघण्याचा धोका कोणत्याही लिंकवर क्लिक न करण्याचा सल्ला : सायबर सेल अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

दिवाळी सण जवळ येत असल्याने ग्राहकांची ऑनलाइन फसवणूक करण्यासाठी सायबर चोरटेही सक्रिय होत आहेत. त्यामुळे स्वस्त मिळतंय, या मोहापायी ऑनलाइन खरेदी करताना ग्राहकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असा सल्ला सायबर सेलने दिला. वर्षातील सर्वात मोठा सण, उत्सव म्हणून दिवाळीकडे पाहिले जाते. दिवाळीनिमित्त ऑनलाइन, ऑफलाइनच्या माध्यमातून विविध वस्तू व साहित्यांची खरेदी केली जाते. दिवाळी सण अवघ्या १५ दिवसांवर आल्याने ऑनलाइन बाजारपेठही



तेजीत असल्याचे दिसून येते. 'दिवाळीदरम्यान स्वस्त किंवा सवलतीत मिळणार विविध वस्तू', असे आमिष दाखवून सायबर चोरट्यांकडून सोशल मीडियावर विविध लिंक पाठवून ऑनलाइन फसवणूक करण्याचा धोकाही वाढत आहे. अनोळखी, अविश्वासार्ह लिंकवर क्लिक केल्यास बँक खाते साफ होण्याचा धोका आहे.

**बनावट संकेतस्थळ?**

बँक, शेअर्स मार्केटमधील ब्रोकर्स कंपनी, इन्शुरस कंपनी, नामांकित ई-वाणिज्य यांच्या नावाशी साधर्म्य असणारी संकेतस्थळे १००० ते २००० रुपये खर्च करून सहज बनविली जातात. सण, उत्सवादरम्यान वस्तू, साहित्य खरेदीच्या नावाखाली विविध प्रलोभने दाखवून ग्राहकांची ऑनलाइन फसवणूक करण्यासाठी सायबर चोरटे सक्रिय होतात. त्यामुळे नामांकित कंपनीच्या नावाशी साधर्म्य असलेल्या संकेत- स्थळाची विश्वासार्हता तपासून पाहावी, संकेतस्थळ बनावट तर नाही ना? याबाबत खात्री करावी.

**काय काळजी घ्यावी?**

वेबसाइटच्या सर्वात खालच्या ठिकाणी वेरी साइन ट्रस्डेट' अशा पद्धतीचे प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) दिलेले आहे किंवा नाही हे तपासून पाहावे. ई-कॉमर्सच्या नियमानुसार वेबसाइट सुरू केली की नाही, याबाबत खात्रीकरावी.संबंधित कंपनीच्या कॉल सेंटरवर फोन करून माहिती घेता येऊ शकते. ज्या कंपनीची वस्तू खरेदी करणार, त्या कंपनीची ऑनलाइन खरेदीसंद- भर्भातील माहिती तपासून घ्यावी.

# उमेदवारीचा सुटेना तिढा;मंगळवारपासून नामांकन : गावागावांत निवडणूक चर्चांना उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाला आहे. जिल्ह्यात ८ विधानसभा मतदारसंघांसाठी मंगळवार (दि. २२) पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. अंतिम मुदत २९ ऑक्टोबरपर्यंत असून, सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्र दाखल करता येणार आहेत. २२ ऑक्टोबरला निवडणुकीची अधिसूचना जारी होईल. दरम्यान, प्रमुख पक्षांच्या उमेदवारीचा तिढा अद्याप संपला नाही. त्यामुळे गावागावांत चर्चांना उधाण आले तर इच्छुकांमध्ये धाकधूक सुरू आहे. विधानसभा निवडणुकीसाठी

निवडणूक आयोगाने उमेदवाराच्या खर्चासाठी ४० लाखांची मर्यादा आहे. उमेदवारांनी निवडणुकीसाठी केलेल्या खर्चाचा हिशेब ठेवावा लागणार आहे. या खर्चाचा तपशील तपासणीसाठी विधानसभा मतदारसंघनिहाय खर्च निरीक्षकांची नियुक्ती आयोगामार्फत करण्यात येईल. उमेदवारांनी अर्ज दाखल करताना निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करून निर्धारित वेळेत अर्ज दाखल करावे, अशा सूचना देण्यात आल्या. उमेदवार हा भारतीय नागरिक असावा, उमेदवाराचे वय २५ वर्षांपेक्षा जास्त असावे. उमेदवाराचे नाव महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार यादीत असावे, अशी नियमांत तरतूद आहे.



**अर्ज दाखल करतेवेळी घ्यायची दक्षता**

उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र विहित नमुना भरावा.उमेदवारास निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे शपथपत्र द्यावे लागेल. शपथपत्र नमुना २६ प्रथम वर्ग दंडाधिकारी-नोटरी यांच्या समक्ष स्वाक्षरी करून सादर करावा. उमेदवाराने मतपत्रिकेवरील छाया-चित्राबाबतचे घोषणापत्र सादर करावे. मतपत्रिकेवर नाव कसे असावे याबाबत उमेदवारांनी लेखी पत्र द्यावे. नामनिर्देशन पत्रासह जमा करावयाची अनामत रक्कम १० हजार रुपये आहे. अनुसूचित जाती अथवा जमाती वर्गातील उमेदवारांनी ५ हजार रुपये रोख स्वरूपात जमा करावी. एक उमेदवार जास्तीत जास्त चार अर्ज दाखल करू शकतात. एक उमेदवार दोनपेक्षा जास्त मत- दारसंघांत अर्ज करू शकणार नाही.

**सूचकांसाठी असा आहे नियम**

उमेदवार मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा असल्यास १ सूचक, अमान्यताप्राप्त पक्ष किंवा अपक्षास १० सूचक आवश्यक आहे. राजकीय पक्षांचे उमेदवारांनी पक्षाने प्राधिकृत केल्याबाबत विहित सूचना पत्र (एबी) अर्जासह सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३ पूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करावा. विहित शपथपत्र नमुना २६ मधील सर्व स्काने भरणे आवश्यक आहे.

**छायाचित्राबाबत सूचना**

उमेदवारांनी तीन महिन्यांच्या आतील कालावधीत काढलेले छायाचित्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे अर्जासोबत किंवा छाननीच्या वेळेपूर्वी सादर करावा. छायाचित्राचा आकार २ बाय २.५ असावा. चेहरा समोर, पूर्ण तसेच डोळे उघडे व मागील बाजू पांढऱ्या रंगाची असावी. छायाचित्र रंगीत किंवा ब्लॅक व व्हॉइट चालेल, उमेदवारांनी सर्वसाधारण कपडे परिधान केलेले असावे, छायाचित्राच्या मागील बाजूला उमेदवाराची किंवा निवडणूक प्रतिनिधींची स्वाक्षरी असावी.